बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१४ गोंदिया | अंक २५ | बुधवार,दि.२८ मे २०२५ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027


## गोंदियासह राज्यातील सर्वच वैद्यकीय महाविद्यालयात शिक्षकांची वानवा

गोंदिया–राज्यभरातील गोंदियासह एकाही शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात १०० टक्के अध्यापक आकृतीबंध नसल्याची माहिती पुढे आली आहे. पायाभूत सुविधांकडे दीर्घकालीन अक्षम्य दुर्लक्ष आणि गंभीर धोका दुर्लक्षून नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय उभारणीचा ध्यास, याचा फटका राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना (शास. मेडिकल कॉलेज) बसला आहे.

आवश्यक शिक्षकवर्ग आणि पायाभूत सुविधांची मोठी कमतरता जाणवल्याने राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने महाराष्ट्रातील नागपूरच्या इंदिरा गांधी मेडिकल कॉलेजचा अपवाद वगळता सर्व गव्हर्न्मेंट मेडिकल कॉलेजना 'कारणे दाखवा' नोटिसा बजावल्या आहेत. त्याचे समाधानकारक स्पष्टीकरण न दिल्यास कोट्यवधी रुपयांच्या दंडाला सामोरे जावे लागू शकते. शिवाय, संबंधित मेडिकल कॉलेजच्या अस्तित्वावरच मंजुरीची तलवार टांगती राहिली आहे.गोंदिया येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात तर ४४.२९ टक्केच पदे भरण्यात आली आहेत.

राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांच्या पायाभूत सुविधांची तपासणी अलीकडेच महाराष्ट्र आयुर्विज्ञान विद्यापीठाच्या पथकांनी केली होती. या पथकांनी सादर केलेल्या अहवालामध्ये गव्हर्न्मेंट मेडिकल कॉलेजमधील पायाभूत सुविधांमध्ये मोठी कमतरता दिसून आली होती. शिवाय, निकषांच्या तुलनेत ५० टक्क्यांपेक्षा कमी शिक्षकवर्ग उपलब्ध असल्याचा धक्कादायक निष्कर्ष पुढे आला होता. यामध्ये रत्नागिरी येथे सुरू झालेल्या गव्हर्न्मेंट मेडिकल कॉलेजमध्ये देशात सर्वात कमी म्हणजे निकषांच्या ११.७६ टक्क्यांवर शिक्षकवर्ग असल्याचे गंभीर वास्तव पुढे आले.

आयोगाने मेंटेनन्स ऑफ स्टैंडर्ड ऑफ मेडिकल एज्युकेशन रेग्युलेशन २०२३ च्या प्रकरण ३ मधील कलम ८ चा वापर करून या नोटिसा काढल्या आहेत. या कलमान्वये वैद्यकीय महाविद्यालयांच्या प्रत्येक कमतरतेसाठी कमाल एक कोटी रुपयांपर्यंत दंड करण्याची तरतूद आहे. राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांच्या पायाभूत सुविधा आणि शिक्षकवर्गाची अवस्था पाहता प्रत्येक महाविद्यालयाला काही कोटी रुपयांचा दंड बसू शकतो.

राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना 'कारणे दाखवा'नोटिसा पाठवून राज्याच्या वैद्यकीय शिक्षण विभागाला मोठा दणका दिला आहे.

राज्यात सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या मकारणे दाखवाफ नोटिसांची नामुष्की येण्यामागे राज्याच्या वैद्यकीय शिक्षण विभागाचा गलथान कारभार कारणीभूत मानला जातो. या विभागाने राज्यात राज्यकर्त्यांच्या हो ला हो म्हणून नव्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचे प्रस्ताव तयार केले. परंतु, त्यानंतर शिक्षकवर्गाच्या उपलब्धतेची बाब गांभीयनि घेतली नाही. वैद्यकीय महाविद्यालयांच्या मंजुरीसाठी राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाचे निकष पूर्ण केल्याचे कागदोपत्री चित्र दाखविण्यासाठी प्रस्थापित शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून शिक्षकवर्ग स्थलांतरित करण्याचे धोरण अवलंबिले गेले. यासाठी शिक्षकांना प्रतिनियुक्तीवर पाठविण्यात आले आणि तपासणीनंतर पुन्हा शिक्षक पूर्वपदावर रुजू झाले.

या अल्पकालीन खेळामध्ये आयोगाच्या डोळ्यात धूळ फेकली गेली. परंतु, आता सत्य चव्हाट्यावर आले आहे. त्याची गांभीयनि दखल घेऊन राज्य शासनाने पावले उचलली नाहीत, तर राज्यातील वैद्यकीय शिक्षण अडचणीत येऊ शकते. गोरगरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांच्या वैद्यकीय शिक्षणाच्या स्वप्नांवर पाणी फिरणार आहे.

शिक्षक भरती, पायाभूत सुविधांना गती हेच पर्याय दंड टाळण्यासाठी राज्य सरकारला शिक्षकवर्गाच्या भरतीची धडक मोहीम सुरू करावी लागेल. अन्यथा राज्यात वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान अटळ आहेच. त्याशिवाय महाविद्यालयाची मंजुरी अडचणीत येऊ शकते.

## महिला जि.प.सदस्य फुले चित्रपटाकरीता कधी घेणार पुढाकार




जि.प.सदस्या सौ.सेठ यांच्या पुढाकाराची सर्वत्र चर्चा

**गोंदिया–** "फुले" चित्रपट स्त्रिया आणि वंचित घटकांच्या हक्कांसाठी लढण्यासाठी एक महत्त्वाचे माध्यम आहे. स्त्रिया आणि इतर घटकांनी या चित्रपटाच्या माध्यमातून सामाजिक न्याय आणि समानतेसाठी पुढाकार घेतल्याचे चित्र असतानाच गोंदिया जिल्हा परिषदेच्या माजी समाजकल्याण सभापती सौ.पुजा अखिलेश सेठ(धुर्वे)यांनी आपल्या जिल्हा परिषद मतदारसंघातील शांळामधील विद्यार्थ्यांना "फुले"चित्रपट दाखवून वैचारिक क्रांतीचा नवा पायंडा घातला आहे.

सौ.सेठ यांनी घेतलेला पुढाकार गोंदिया जिल्हा परिषदेत सदस्य म्हणून निवडून आलेल्या इतर महिला सदस्य कधी घेणार अशा प्रश्न आता उपस्थित होऊ लागला आहे.ज्या "फुले"दाम्पत्यामुळे महिलांना शिक्षणाची दारं उघडली गेली,त्या दाम्पत्याच्या आयुष्यावर असलेला चित्रपट आपल्या परिसरातील शाळामधील विद्यार्थ्यांना दाखवण्याकरीता पुढाकार घ्यायला हवे.सध्या राज्यातील सत्ताधारी पक्षाच्यावतीने अहिल्याबाई होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त ज्याप्रमाणे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.त्याचप्रमाणे राज्यातील महायुतीच्या महिला पदाधिकार्यांनी "फुले" चित्रपटाकरीता सुध्दा पुढाकार घेतल्यास येणार्या पिढीला इतिहासाची माहिती होण्यास मदत होणार आहे.

"फुले"चित्रपट दाखवण्यासाठी, स्त्रिया आणि इतर वंचित घटकांनी अनेक ठिकाणी पुढाकार घेतला आहे. या चित्रपटाने सामाजिक न्यायासाठी केलेल्या कार्याला आणि महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या योगदानाला महत्त्व दिले आहे.स्त्रिया आणि इतर वंचित घटकांनी या चित्रपटाच्या माध्यमातून सामाजिक न्याय आणि समानतेसाठी आवाज उठवला आहे.महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणासाठी केलेल्या कार्याला महत्त्व देणारी चळवळ कशापध्दतीने त्यांनी राबवली हे बघणे महिला सबलीकरणासाठी महत्त्वपूर्ण आहे.

## राज्यातील आदिवासी आश्रमशाळामध्ये कंत्राटी शिक्षकांची होणार भरती

**गोंदिया:–** आदिवासी विभागाने आश्रम शाळांमध्ये शिक्षकांच्या १७९१ मंजूर पदांची सेवा बाह्यस्रोतांद्वारे (कंत्राटी) उपलब्ध करून घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्याची निविदा प्रक्रिया राबवण्यासाठी ८४ कोटी ७४ लाख ५५ हजार रुपये इतक्या अंदाजित रकमेच्या प्रस्तावाला मान्यता देण्यात आली आहे.

आदिवासी विकास विभागाने याबाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला. १६ नोव्हेंबर २०२२च्या निर्णयाद्वारे आदिवासी विकास विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयाचा सुधारित आकृतिबंध निश्चित करण्यात आला आहे. या सुधारित आकृतिबंधानुसार आदिवासी विकास विभागाच्या शासकीय आश्रमशाळांतील शिक्षकांच्या मंजूर १७९१ पदांच्या सेवा बाह्यस्रोतांद्वारे उपलब्ध करून घेण्यासाठी जीईएम संकेतस्थळावर निविदा प्रक्रिया राबवली जाणार आहे.

बाह्यस्रोतांद्वारे उपलब्ध केल्या जाणाऱ्या शिक्षकांमध्ये २२९ उच्च माध्यमिक शिक्षक, ४५५ माध्यमिक शिक्षक, १२० पदवीधर प्राथमिक शिक्षक, १७८ प्राथमिक शिक्षक इंग्रजी, ८०९ प्राथमिक शिक्षक मराठी यांचा समावेश असल्याचे शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

मात्र, राज्यात शिक्षकांच्या भरतीसाठी पवित्र संकेतस्थळामाफ ‘त प्रक्रिया राबवण्यात येत असताना आदिवासी विकास विभागाच्या अखत्यारितील शाळांमध्ये बाह्यस्रोतांद्वारे शिक्षकांची सेवा घेण्याचा अर्थ काय,फ असा सवाल माजी मुख्याध्यापक महेंद्र गणपुले यांनी उपस्थित केला. ते म्हणाले, मशिक्षण घेऊन पात्रता मिळवलेल्या, शिक्षक होण्याचे स्वप्न पाहणाऱ्यांनी यातून काय अर्थ घ्यायचा? २०२२मधील प्रस्ताव आता मंजूर केला जातो, म्हणजे इतकी प्रचंड पदे अद्याप भरलेली नाहीत हे आश्चर्य आहे. शिक्षण क्षेत्रात नेहमी विसंगत आदेशांचा अनुभव येत आहे.



### आश्रम शाळा किती?

**आदिवासी विकास विभागांच्या संकेतस्थळावरील माहितीनुसार, अतिदुर्गम व डोंगराळ भागात राहणाऱ्या अनुसूचित जमातीच्या लोकांचा आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकास जलदगतीने घडवून आणण्यासाठी १९७२–७३ पासून शासनाने निवासी आश्रमशाळा समूह योजना कार्यान्वित केलेली आहे. ही योजना मुख्यत्वे अतिदुर्गम, डोंगराळ व पाड्यातील आदिवासी मुला–मुलींमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करून त्यांना सुशिक्षित करणे आणि त्यायोगे त्यांचे जीवनमान उंचावणे या उद्देशाने राबविण्यात येते. शिक्षणाची गंगा दऱ्याखोऱ्यांत, दुर्गम पाड्यांत पोहोचविण्याचे काम शासकीय आश्रम शाळांमार्फत होत आहे. आदिवासी विकास विभागाच्या अखत्यारित ४९७ शासकीय आश्रम शाळा, ५५६ अनुदानित आश्रम शाळा आहेत.**

## गडचिरोली पोलीस आणि माओवाद्यांमध्ये झालेल्या चकमकीत चार कट्टर माओवादी ठार

**गडचिरोली:–** महाराष्ट्र छत्तीसगड सीमेवर नुकतेच स्थापन केलेल्या पोस्टे कवंडे हद्दीत काही माओवादी दबा धरून बसले असल्याच्या विश्वसाई माहितीच्या आधारे, अति. पोलीस अधीक्षक एम. रमेश यांच्या नेतृत्वाखालील १२ सी ६० पथके (३०० कमांडो) आणि सीआरपीएफची एक तुकडी काल दुपारी कवंडे आणि नेलगुंडा येथून इंद्रावती नदीच्या काठावरील परिसरात मुसळधार पावसादरम्यान रवाना करण्यात आल्या होत्या.

आज सकाळी सदर परिसरामध्ये पोलीस पथक घेराबंदी करून शोध मोहीम राबवत असताना, माओवाद्यांनी सी६० जवानांवर अंदाधुंद गोळीबार सुरु केला. ज्याला पोलीस पथकाने प्रभावी प्रत्युत्तर दिले. जवळजवळ दोन तास अधूनमधून गोळीबार सुरू होता.

यानंतर पोलीस पथकाने परिसरात शोध मोहीम राबवल्यानंतर ४ जहाल माओवाद्यांचे मृतदेह, एक स्वयंचलित सेल्फ लोडिंग रायफल(डङठ), दोन .३०३ रायफल आणि एक भरमार मिळून आले आहेत. याशिवाय, घटनास्थळावरून वॉकी टॉकी, छावणी साहित्य, नक्षलवादी साहित्य इत्यादी जप्त करण्यात आले आहेत.उर्वरित माओवाद्यांच्या शोधासाठी परिसरात शोध मोहिम सुरू आहे.

## गोंदिया जिल्हा बँककरिता २९ जून रोजी मतदान

### ३० जूनला मतमोजणी, एकूण २० संचालकपदांसाठी निवडणूक



गोंदिया :– तब्बल १३ वर्षांनंतर गोंदिया जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निवडणूक होत असून, याचा निवडणूक कार्यक्रम सोमवारी (दि. २६) जाहीर झाला. एकूण २० संचालकपदांसाठी ही निवडणूक होणार आहे. यासाठी नामनिर्देशनपत्र दाखल करण्यास सोमवारपासून सुरुवात झाली आहे. २९ जून रोजी मतदान होणार असून, ३० जूनला मतमोजणी होणार आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर सहकार क्षेत्रातील घडामोडींना वेग आला आहे.

जिल्ह्यातील सहकार क्षेत्रावर वर्चस्व ठेवण्यासाठी जिल्हा बँकेची निवडणूक महत्त्वपूर्ण मानली जात आहे. एकूण २० संचालकपदांसाठी ही निवडणूक होत आहे. काही तांत्रिक अडचणींमुळे गेल्या १३ वर्षापासून जिल्हा बँकेची निवडणूक लांबणीवर गेली होती. त्यामुळे जिल्हा बँकेची निवडणूक केव्हा जाहीर होते, याकडे जिल्ह्यातील सहकार क्षेत्राचे लक्ष लागले होते. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दोन महिन्यांपूर्वीच सहा महिन्यांच्या आत जिल्हा बँकेची निवडणूक घेण्याचे निर्देश दिले होते. त्यानंतर सहकार निबंधक कार्यालयाने प्रक्रियेला सुरुवात केली होती. यानंतर सोमवारी विभागीय सहनिबंधक यांनी जिल्हा बँक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला.

त्यामुळे निवडणूक प्रक्रियेला आता खऱ्या अर्थाने सुरुवात झाली असून, निवडणूक लढवू इच्छिणाऱ्यांनी त्यासाठी मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे. जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदी गेल्या पंधरा ते वीस वर्षांपासून राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आ. राजेंद्र जैन हे विराजमान आहेत. त्यामुळे त्यांच्यासाठी ही निवडणूक प्रतिष्ठेची आहे, तर काँग्रेस आणि उद्धवसेनेनेसुद्धा जिल्हा बँकेची निवडणूक ही प्रतिष्ठेची केली आहे. त्यासाठी या सर्वांनी गेल्या दोन महिन्यांपासून मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे. जिल्हा बँक निवडणुकीमुळे ऐन पावसाळ्यात जिल्ह्यातील राजकारणात रंगत येणार आहे.



या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप व शिवसेना शिंदे गट महायुती म्हणून निवडणूक लढणार आहेत. यात १० जागा राष्ट्रवादी काँग्रेस आणि १० जागा भाजप–शिंदेगटाला देण्याचे सुत्र ठरले आहे. महायुतीकडून बँकेचे विद्यमान अध्यक्ष माजी आमदार राजेंद्र जैन पुन्हा रिंगणात उतरणार आहेत. सोबतच माजी आमदार भेरसिंह नागपुरे, तिरोड्याचे आमदार विजय रहांगडाले, जिल्हा बँकेचे सचिव डॉ. अविनाश जायस्वाल, सुभाष आकरे हे निवडणुकीच्या रिंगणात रहाण्याची शक्यता आहे. गोरेगाव तालुक्यातून महायुतीकडून सेवा सहकारी गटात विद्यमान संचालक रेखलाल टेंभरे यांच्यासह बाजार समितीचे माजी सभापती योगराज पारधी, विजय राणे व दूर्गा ठाकरे यांच्या नावाची चर्चा आहे. देवरी तालुक्यातून प्रमोद संगीडवार व पंचायत समिती सभापती अनिल बिसेन यांच्या नावाची चर्चा आहे. तर दुसरीकडे महविकास आघाडीतर्फे प्रफुल अग्रवाल, बँकेचे उपाध्यक्ष राधेलाल पटले, उषा मेंढे, माजी आमदार दिलीप बन्सोड, अशोक (गप्पू) गुप्ता, शिवसेनेचे पंकज यादव आदिंच्या नावाची चर्चा आहे.

### ८९४ सभासद बजावणार मतदानाचा हक्क

**गोंदिया जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे पूर्वी एकूण १२३३ सभासद होते. पण, गेल्या १३ वर्षात काही सभासदांचा मृत्यू, तर काही सभासद थकबाकीमुळे व इतर कारणामुळे अपात्र ठरले. त्यामुळे आता ८९४ एकूण सभासद असून, ते निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावणार आहेत.**

## जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी घेतला दक्षता समिती सभेचा आढावा



**गोंदिया:** गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व निदान तंत्रे (लिंग निवडीस प्रतिबंध कायदा) १९९४ सुधारित २००३ अंतर्गत जिल्हा दक्षता समितीची सभा जिल्हाधिकारी प्रजित नायर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली.

पीसीपीएनडीटी कायदा अंतर्गत जिल्हास्तरीय दक्षता पथक माहे एप्रिल २०२५ पर्यंत झालेल्या कामाचा आढावा यावेळी घेण्यात आला.यावेळी जिल्हानिहाय तसेच तालुकानिहाय लिंग गुणोत्तर दर टक्केवारी तसेच संबंधित आराखडयाचे सादरीकरण करण्यात आले तसेच कायद्याची गरज, कायद्यातील महत्त्वाची कलमे व नियम, हेतू याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

सभेला मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरूगानंथम, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अमरिश मोहबे,जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.नितीन वानखेडे,सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अरविंदकुमार वाघमारे,शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे बालरोग तज्ञ डॉ.लिना धांडे,बाई गंगाबाई स्त्री रुग्णालयाचे सहाय्यक जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.पवन राऊत,निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.भारती जयस्वाल,बीजीडब्ल्यु रुग्णालयाचे वैद्यकिय अधिकारी डॉ.सलील पाटील,जिल्हा माध्यम व विस्तार अधिकारी विजय आखाडे, जिल्हा आय.ई.सी अधिकारी प्रशांत खरात, तसेच डॉ.संगिता भोयर, डॉ.प्रणित पाटील,डॉ.ललित कुकडे, डॉ.विनोद चव्हाण, डॉ.निलेश जाधव,डॉ.कविश्वर किरसान, डॉ.अमित खोडनकर तसेच तालुका आरोग्य अधिकारी व शासकीय कार्यालयाचे अधिकारी उपस्थित होते.

## आरडीसी ५ लाखाची लाच घेतांना अटक

**छ. संभाजीनगर :** महाराष्ट्रात गेल्या काही महिन्यात सरकारी अधिकाऱ्यांकडून लाच घेण्याचं प्रमाण वाढल्याचं दिसून येत आहे. आता छत्रपती संभाजीनगरमध्ये चक्क निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांस अटक करण्यात आली आहे. तब्बल ५ लाख रुपयांची लाच घेताना एसीबीने आरडीसीना रंगेहात अटक केली आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयातील आरडीसी म्हणजेच निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना ५ लाख रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांकडून अटक करण्यात आली आहे. अव्वल कारकुनामार्फत ही लाच घेण्यात येत असताना अटक करण्यात आली असून विनोद खिरोळकर असं आरडीसींचं नाव आहे. वर्ग २ ची जमीन वर्ग १ करण्यासाठीपूर्वी या निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांनी मोठ्या लाचेची मागणी केली होती. त्यानुसार, संबधित तक्रारदाराकडून २३ लाख रुपये घेतले होते. मात्र, तरीही १८ लाख पुन्हा मागण्यात आले होते. त्यातील ५ लाख रुपयांची लाच घेताना आरोपीला अटक करण्यात आली आहे. अव्वल कारकून त्रिभुवन यांच्यामार्फत ही लाच घेतली जात होती.

## गांजासह पोलिसांच्या हाती लागले २० लाख रुपये रोख

**गोंदिया :–** रावणवाडी पोलिस ठाण्यांतर्गत येणाऱ्या कामठा येथील उमेश उर्फ करण हरिचंद अग्रवाल याच्या घरी धाड घालून स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी स्कूल बॅगमध्ये विक्रीकरिता साठवून ठेवलेला ६०० ग्रॅम गांजा किंमत १२ हजार व ५०० रुपयांच्या ४ हजार नोटा (२० लाख रुपये) असा एकूण २० लाख १२ हजार ५०० रुपयांचा माल जप्त केला आहे.



पोलिस अधीक्षक गोरख भामरे, अप्पर पोलिस अधीक्षक नित्यानंद झा यांच्या निर्देशाप्रमाणे जिल्ह्यात अवैधरित्या अमली पदार्थ गांजाची विक्री, वापर, साठा व वाहतूक करणाऱ्या विरुद्ध धाड कारवाई प्रभाती राबविण्याचे निर्देश सर्व ठाणेदारांना दिले आहेत. २५ मे रोजी वरिष्ठांच्या निर्देशाप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गुप्त माहितीच्या आधारे कामठा येथे अमली पदार्थ गांजा बाळगणाऱ्याविरुद्ध कारवाई केली. फरार आरोपी उमेश उर्फ करण हरिचंद अग्रवाल (२५, रा. कामठा) हा पोलिसांची चाहूल लागताच पळून गेला. त्याची आई ललिता अग्रवाल यांच्या समक्ष घराची झडती घेतली असता, लोखंडी कपाटात एका निळ्या रंगाच्या स्कूल बॅगमध्ये विक्रीकरिता साठवून ठेवलेला ६०० ग्रॅम ओलसर, पाने, फुले, फळे, बिया मिश्रित गांजा किंमत १२ हजारांचा माल जप्त केला.

गांजाच्याच बॅगमध्ये गांजा विक्रीच्या पैशातून साठवून ठेवलेली रक्कम ५०० रुपयांच्या ४ हजार नोटा एकूण २० लाख रुपये जप्त करण्यात आले. फरार आरोपी उमेश उर्फ करण हरिचंद अग्रवाल (२५, रा. कामठा) याच्याविरुद्ध पोलिस ठाणे रावणवाडी येथे पोलिस उपनिरीक्षक शरद सैदाणे यांच्या तक्रारीवरून एनडीपीएस कायद्याचे कलम ८ (क), २० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास वरिष्ठांचे निर्देश सूचनेप्रमाणे पोलिस ठाणे रावणवाडी पोलिस करीत आहेत.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक दिनेश लबडे, महिला पोलिस उपनिरीक्षक वनिता सायकर, शरद मैदाने, हवालदार राजू मिश्रा, महेश मेहर, दुर्गेश तिवारी, सुजित हलमारे, सोमेंद्र तुरकर, संतोष केदार, कुमुद येरणे, घनश्याम कुंभलवार यांनी कारवाई केली आहे.

## ६५० घरकुल लाभार्थ्यांना १३०० ब्रास रेतीचे वितरण

**गोंदिया :–** शासनाने घरकुल लाभार्थ्यांना पाच ब्रास मोफत रेती उपलब्ध करून देण्याच्या निर्णयाची प्रभावीपणे अंमलबजावणी करीत गोंदिया तालुक्यातील ६५० घरकुल लाभार्थ्यांना १३०० ब्रास रेती उपलब्ध करून देण्यात आली. विशेष म्हणजे राज्यात या निर्णयाची अंमबजावणी करण्यात गोंदिया तालुका प्रथम ठरला असल्याची माहिती आ. विनोद अग्रवाल यांनी दिली.

पंचायत समिती सभागृहात आयोजित कार्यक्रमात लाभार्थ्यांना रॉयल्टीचे वाटप करण्यात आले. यावेळी आ. विनोद अग्रवाल, जिल्हाधिकारी प्रजित नायर, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगनाथम, पंचायत समिती सभापती मुनेश रहांगडाले, तहसीलदार शमशेर पठान, खंडविकास अधिकारी आनंद पिंगळे, अपर तहसीलदार श्रीकांत कांबळे, तालुका कृषी अधिकारी नेहा आढव, पंचायत समिती सदस्य विद्याकला पटले, शंकर टेंभरे उपस्थित होते.




रेतीची रॉयल्टी मिळण्याची प्रक्रिया पूर्वी फारच किचकट होती. त्यामुळे घरकुल लाभार्थ्यांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. रेती घाटलिलाव प्रक्रियेच्या नवीन धोरणामुळे दीड वर्षांपासून रेतीघाटांचे लिलाव न झाल्याने घरकुल लाभार्थी अडचणीत आले आहे.

घरकुलाचे बांधकाम करण्यासाठी त्यांना अतिरिक्त दराने रेतीची खरेदी करावी लागत होती, तर प्रत्येक लाभार्थ्याला हे शक्य नसल्याने अनेक घरकुलांचे बांधकाम रखडले होते. यासंदर्भात आ. विनोद अग्रवाल यांनी राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे व वित्त नियोजन राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्याकडे पाठपुरावा केला. त्यामुळे ऑफलाइन रॉयल्टी देण्याची प्रक्रिया सुलभ करण्यात आली.

### तीन दिवसांत १६ हजार ऑफलाइन परवाने

**आ. विनोद अग्रवाल यांनी महसूल विभागाच्या यंत्रणा शासन निर्णयाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचे निर्देश आढावा बैठक घेऊन दिले होते. त्यानंतर केवळ तीन दिवसांत १६ हजार ऑफलाईन परवाने प्राप्त झाले. त्यापैकी ६५० घरकुल लाभार्थ्यांना प्रत्येकी दोन ब्रास याप्रमाणे पहिल्या टप्प्यात १३०० ब्रास रेती उपलब्ध करून देण्यात आली, घरकुल लाभार्थ्यांना एकूण पाच ब्रास रेती मोफत उपलब्ध करून दिली जाणार आहे.**

### आरक्षित घाटावरून रेतीचे वितरण

**घरकुल लाभार्थ्यांना रेतीचे वितरण करण्यासाठी गोंदिया तालुक्यातील किन्ही, महालगाव, सतोना हे तीन घाट आरक्षित करण्यात आले आहे. याच आरक्षित घाटावरून घरकुल लाभार्थ्यांना मोफत रेती उपलब्ध करून दिली जात आहे. तसेच ही प्रक्रिया पारदर्शकपणे राबविण्यावर भर दिला जात आहे.**

## संपादकीय

# भारत चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था

भारत आता चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनला आहे आणि ही मोदी सरकारच्या आणि देशाच्या १४० कोटी भारतीयांच्या दृष्टीने अभिमानाची बाब आहे. भारत पूर्वी हत्ती आणि सापांचा देश म्हणून ओळखला जात असे. आता त्याचे रूपांतर एका विकसित नव्हे पण विकासाच्या मार्गावर असलेल्या चौथ्या क्रमांकाच्या अर्थव्यवस्थेत होत आहे ही आपल्या सर्वांसाठी निश्चितच आनंदाची आणि मुजरा करण्यायोग्य बाब आहे. नीती आयोगाचे सीईओ बीव्हीआर सुब्रमण्यम यांनी ही माहिती नुकतीच दिली आणि भारतापुढे आता चीन, अमेरिका आणि जर्मनी हेच तीन देश आहेत अशीही त्यांनी माहिती दिली आणि ही माहिती केवळ भारतीयाने दिली नाही तर भारतद्वेष्ट्या अशा आयएमएफने दिली आहे. त्यामुळे ही आकडेवारी विश्वसनीय आहे. कारण तेथे तर कुणी मोदी भक्त नाही तर उलट मोदींचा आणि भारताचा द्वेषच करणारे आहेत. भारत आता जपानला मागे टाकून चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनला आहे हे निःसंशय गौरवास्पद आहे. हे श्रेय जसे मोदी यांचे आहे तसेच ते १४० कोटी भारतीयांचे आहे, या देशातील प्रत्येक नागरिकाचे आहे.

भारत आता जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनला आहे आणि त्याला कारण ठरली आहे ती, भारतातील भू राजकीय स्थिती आणि अत्यंत अनुकूल आर्थिक वातावरण. ४ ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था आज भारताची आहे आणि हे स्थित्यंतर जबरदस्त आहे, तसेच ते देशाची कहाणी सांगणारी आहे. आयएमएफच्या आकडेवारीनुसार भारत आज जपानपेक्षा मोठा आहे आणि भारताच्या पुढे आज फक्त जर्मनी, अमेरिका आणि चीन आहेत. पण हे यश भारताला सहजसाध्य मिळालेले नाही. अर्थव्यवस्थेचा आकार मोजला जातो तो जीडीपीच्या माध्यमातून आणि तोच जपानपेक्षा काहीसा जास्त आहे. आयएमएफच्या अहवालात म्हटले होते की, विकासाचा आऊटलुक २०२५ मध्ये ६.२ टक्के होता. त्याला खासगी सहभाग आणि उपभोगाने विशेषतः ग्रामीण भागात चांगल्या मागणीचा हातभार लागला आहे. त्याशिवाय भारताचे बाजारपेठीय पोटेन्शियल आणि व्यापक होत चाललेले आर्थिक क्षेत्र, वाढते जागतिक व्यापार आणि गुंतवणूक फ्लोमध्ये सहभाग यामुळे भारताची अर्थव्यवस्था आज या मुक्कामाला पोहोचली आहे.


पंतप्रधान मोदी यांनी २०१४ मध्ये सत्ता हस्तगत केली. तेव्हापासून भाजपाच सत्तेत आहे आणि त्या काळापासूनच देशाची प्रगती अखंड आणि अविरत सुरू आहे. काँग्रेसच्या काळात गुंतवणूकदारांचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील विश्वास उडाला होता आणि भ्रष्टाचाराच्या अनेक प्रकरणामुळे गुंतवणूकदारांचा विश्वास कमजोर झाला होता. पण मोदी सत्तेवर आल्यावर त्यानी "न खाने दूंगा ना खाऊंगा...' अशी घोषणा दिली आणि त्यानुसार एकही भ्रष्टाचाराची तक्रार नोंदवण्यात आलेली नाही. अन्यथा काँग्रेसच्या काळात भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे चर्चेत होती आणि रोज वृत्तपत्रांना नवीन मसाला पुरवला जात होता. पण आज ती परिस्थिती राहिलेली नाही. हा गुणात्मक बदल मोदी आल्यापासून झाला आहे. त्यामुळे गुंतवणूकदारांचा विश्वास परत आला आहे आणि त्यामुळे भारत आज चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनला आहे. पण हे काम सोपे नव्हते. त्यासाठी मोदी यांची विलक्षण जिद्द आणि निर्धार तसेच तमाम भारतीयांची मोदी यांना मिळालेली साथ ही कारणे होती. केवळ आर्थिक विकासाच्या आकडेवारीवर विचार केला तरी मोदी सरकारची कामगिरी या दहा वर्षांत प्रभावी राहिली आहे. अर्थात मोदी यांची ही कामगिरी असामान्य असली तरीही पुरेशी प्रशंसा करण्यालायक मात्र नाही हे कबूल करणे भाग आहे. जरी मोदी सरकारची आर्थिक कामगिरी जबरदस्त असली तरीही कोट्यवधी भारतीय गरीबच आहेत. तसेच नोकऱ्यांचे भयावह वास्तव आहे. त्यामुळे तरुणांना रोजगाराचा लाभ होत नाही तोपर्यंत भारत सुखी आहे असे म्हणवत नाही.

अर्थव्यवस्था जरी समाधानकारक असली तरीही काही बॉटलनेक्स आहेत. त्यात सर्वप्रथम आहे तो गरिबीचा. गरिबी आणि असमानतेचे अंदाज याबाबतचे वास्तविक चित्र समोर येत नाही. मोदी यांनी रस्ते आणि पायाभूत सुविधा उभारण्यावर जोर दिला आहे आणि त्यामुळे आपल्याला देशात आज अनेक ठिकाणी चांगले रस्ते आणि पूल तसेच सेतू बांधलेले दिसून येतात. पण त्याबरोबरच डिजिटल प्रणालीचा वापर व्हावा तितक्या प्रमाणात वाढलेला दिसत नाही, यावर मोदींनी विचार केला पाहिजे. कारण चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था म्हणायचे आणि व्यवहार तसेच पूर्वीच्या पद्धतीने करत राहायचे हे चांगले नाही. कोणत्याही देशाला ते शोभण्यासारखे नाही. मोदी यांनी शौचालये बांधण्याच्या योजना आणल्या आणि देश हागणदारी मुक्त केला. पण अजूनही ग्रामीण भागात काही ठिकाणी ही स्थिती आहेच आणि शेवटी अमर्त्य सेन यांनी म्हटल्याप्रमाणे शेवटच्या पायरीवर उभ्या असलेल्या माणसाला जोपर्यंत विकासाची फळे मिळणार नाहीत तोपर्यंत त्या विकासाची फळे शेवटपर्यंत पोहोचली असे म्हणता येणार नाहीत. त्याबाबतीत मोदी यांना अजून बरेच कार्य करायचे आहे. पण मोदी हे कार्य करून दाखवतील यात अजिबात शंका नाही. भारताच्या विकासाने झेप घेतली आहे पण महामारीचा काळ आणि त्यादरम्यान झालेले धान्य वितरण वेगाने झाले. ही निःसंशय स्पृहणीय बाब होती, पण त्याच काळात सरकारच्या अन्न बिलात पाच पट वाढ झाली. मोदींच्या या यशात इतरही काही क्षेत्रांचा वाटा आहे. ती क्षेत्रे म्हटली तर विजेचे प्रमाण आणि तिचा वाढता वापर तसेच डीबीटीच्या माध्यमातून गरिबांना रोख रकमेचे हस्तांतरण करण्यात येत असल्यामुळे त्यातील भ्रष्टाचारच कमी झाला हेही मोदी यांच्या कार्याचे यशच म्हणावे लागेल... मोदी सरकारने भारताची अर्थव्यवस्था आज वाढवली आहे इतकी ती चौथ्या क्रमांकाची बनवली आहे. पण अजूनही भारतातील अकुशल आणि गरीब वर्ग मोठ्या प्रमाणात बेरोजगार आहे आणि त्याच्यासाठी मोदी सरकार नोकऱ्या उपलब्ध करू शकलेले नाही ही वस्तुस्थिती आहे. अजूनही भारतातील बहुसंख्य वर्ग शेतीवरच अवलंबून आहे. ही आव्हाने आहेतच पण मोदी यांचे यश निश्चित अभूतपूर्व आहे.

# तंबाखू खाणाऱ्या १३८ जणांना लागला ७४ हजारांचा चुना!

**गोंदिया :–** जिल्ह्यातील सर्व शासकीय आणि निमशासकीय कार्यालये तंबाखूमुक्त व्हावी, यासाठी त्यांची तपासणी करण्याचे आदेश जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी दिले. त्यासाठी जिल्ह्यातील सर्वच शासकीय कार्यालयांची तपासणी करण्यात येत आहे. आरोग्य विभागाच्या अंमलबजावणी पथकाने सन २०२४–२५ या वर्षात तब्बल १८ कार्यालयांत धाडसत्र राबवून १३८ लोकांना तंबाखू खाताना पकडले. या कारवाईत तब्बल ७४ हजार २० रुपये दंड आकारून ती रक्कम शासकीय तिजोरीत जमा करण्यात आली.

या कारवाईत आरोग्य विभागाने १७हजार ६२० रुपयांचा दंड तर पोलिस विभागाने ६ पोलिस ठाण्यांच्या हद्दीतून ५६ हजार ४०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. जिल्हाधिकारी प्रजित नायर, पोलिस अधीक्षक गोरख भामरे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम या प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या एकत्रित सहकार्याने तंबाखू नियंत्रण कोटपा कायदा २००३ अंतर्गत उपलब्ध मनुष्यबळात विविध दंडात्मक कारवाई सुरू आहे.



जिल्ह्यात के.टी.एस. शासकीय सामान्य रुग्णालय येथे राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अमरीश मोहबे व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नितीन वानखेडे यांच्या मार्गदर्शनात आरोग्य विभागाचे अंमलबजावणी पथक कार्यरत आहे.

राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जिल्हास्तरीय अंमलबजावणी पथकात जिल्हा मौखिक आरोग्य अधिकारी डॉ. अनिल आटे, दंतरोगतज्ज्ञ डॉ. अमोल राठोड, जिल्हा सल्लागार डॉ. ज्योती राठोड, मनोवैज्ञानिक सुरेखा आझाद मेश्राम, सामाजिक कार्यकर्त्या संध्या शंभरकर, दंत सहायक विवेकानंद कोरे हे विविध कार्यालयांत धाडसत्र राबवून कोटपा कायद्याची जनजागृती करीत आहेत.

### येथे राबविणार धाडसत्र

**जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग, नगर परिषद, तहसील कार्यालये, पोस्ट ऑफिस, वन विभाग, आरोग्य संस्था, बँका, सहकारी संस्था यांच्यासह विविध कार्यालयांत झाडाझडती घेण्यात येत आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम यांनीसुद्धा पंचायत समिती कार्यालये, शाळा, ग्रामपंचायत तंबाखूमुक्त करण्यासाठी वेगवेगळ्या पथकांची निर्मितीवर भर देऊन धाडसत्र राबविण्याच्या सूचना आरोग्य विभागाच्या अंमलबजावणी पथकाला दिल्या आहेत.**

## चाळिशीनंतर नंतर प्रत्येकाने आपल्या आरोग्याचे सगळ्या चाचण्या करणे गरजेचे– डॉ.सुरभी गिर्हेपुंजे

**देवरी:–** कायदा सुव्यवस्थेचे रक्षण करताना, गुन्ह्यांचा तपास, आंदोलने, मोर्चे, व्हीआयपीचे दौरे, नक्षलविरोधी गस्त यामुळे पोलिसांना जास्त वेळ कर्तव्य बजवावे लागते. या कारणाने त्यांना स्वतःच्या आरोग्याची काळजी घेता येत नाही.या सर्व गोष्टींच्या विचार करून साप्ताहिक आरोग्य मेळाव्यातुन देवरी तालुक्यातील अतिदुर्गम व नक्षल प्रभावित पोलीस स्टेशन चिचगड अंतर्गत मगरडोह तेथील "एक दिवस पोलीसांसाठी" या नाविण्यपुर्ण उपक्रमातुन सशस्त्र दूरक्षेत्र पोलीस ठाणे मगरडोह येथील पोलिसांची व कार्यक्षेत्रातील नागरिकांची आरोग्य तपासणी दि.२४ मे रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र पालांदुर/जमी. मार्फत करण्यात आली.

लोकसंख्येच्या तुलनेत पोलिसांकडे मनुष्यबळ कमी असल्याने उपलब्ध कर्मचाऱ्यांवर ताण येतो.अनेकदा पंधरा ते सोळा तास काम करावे लागते. जागरण, अवेळी जेवण यामुळे अनेक व्याधी जडू शकतात.पोलिसांनी निरोगी राहावे या उद्देशाने आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याचे वैद्यकीय अधिकारी डॉ.सुरभी गिर्हेपुंजे यांनी याप्रसंगी म्हटले आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक,जमादार,हवलदार असे विविध पदांचे अधिकारी, कर्मचारी व कार्यक्षेत्रातील नागरिक रक्तदाब, मधुमेह, सिकलसेल, विविध प्रयोगशाळा तपासणी रक्त तपासणी व समुपदेशन सोबत स्थलांतरीत लोकांचे हिवताप रक्त नमुने, आरडीके किट ने रक्त सुद्धा तपासणी करण्यात आले. चाळिशीनंतर नंतर प्रत्येकाने आपल्या आरोग्याचे सगळ्या चाचण्या करणे गरजेचे असल्याचे यावेळी पालांदुर/जमी.चे वैद्यकीय अधिकारी डॉ.सुरभी गिर्हेपुंजे यांनी याप्रसंगी म्हटले.

शिबीरा दरम्यान वैद्यकीय अधिकारी डॉ.सुरभी गिर्हेपुंजे,आरोग्य सहायिका शोभा पडोळे,आरोग्य सेविका साधना डोरले, फार्मासिस्ट मोनिका बहेकार,आरोग्य सेवक सदाशिव अण्णाकडे तसेच आशा सेविका यांनी आरोग्य सेवा दिली.उपस्थितांना वैद्यकिय अधिकारी डॉ.सुरभी गिर्हेपुंजे यांनी सिकलसेल व असंसर्गजन्य आजार जसे रक्तदाब, मधुमेह व कर्करोग विषयी मार्गदर्शन व समुपदेशन केले.

# १.९० लाख धान उत्पादक सानुग्रहाच्या प्रतीक्षेत

**गोंदिया:–** आर्थिक बळ देण्यासाठी गत काही वर्षापासून राज्य शासन धान उत्पादकांना सानुग्रह अनुदान अर्थात बोनस देते. घोषनेनंतर शासन आदेश जारी होऊन दोन महिने लोटत असताना अद्यापही धान उत्पादकांच्या बँक खात्यात सानुग्रह अनुदान जमा न झाल्याने जिल्हयातील १.९० लाख शेतकरी खरीप हंगामाच्या तोंडावर आर्थिक विवंचनेत सापडले आहेत. त्यातच अवकाळी पावसाने धान उत्पादकांची डोकेदुखी आणखीनच वाढविली असल्याने शेतकरी मेटाकुटीस आला आहे.

बी–बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके, मजुरीचे वाढलेले दर यामुळे शेतमाल उत्पादन खर्चातही भरमसाठ वाढ झाली आहे. उत्पादन खर्चाच्या तुलनेत धानाला




मिळणारा अल्प दर यामुळे धान शेती फायद्याची नसल्याची ओरड धान उत्पादकांकडून होत आहे. त्यातच शासनाकडून धानाला मिळणारा हमी दरही कमी. हे मान्य करून धान उत्पादक राज्यांमध्ये तेथील सरकारने धान उत्पदकांना सानुग्रह अनुदान देणे सुरू केले. राज्यातही गत काही वर्षांपासून सानुग्रह अनुदान दिले जाते. राज्य सरकारने डिसेंबर महिन्यात नागपूरातील विधीमंडळ अधिवेशनात धान उत्पदकांना प्रति हेक्टर २० हजार दोन हेक्टरच्या मर्यादेत ५० हजार रुपये देण्याची घोषणा केली होती. यानंतर निधीची तरतूद करून २५ मार्च रोजी शासनाने परिपत्रक जारी केला. मात्र अद्यापही बोनसची रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात पडली नाही. रक्कम आज–उद्या मिळेल या अपेक्षेत दोन महिने लोटत आहेत. खरीप हंगाम सुरू होण्यास पंधरवाडाच शिल्लक आहे. शेत मशागत, बी–बियाणे, खते, किटकनाशके खरेदीची लगबग सुरू झाली आहे. अशातच बोनस मिळाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक हातभार मिळेल.

जिल्हयात आदिवासी भागांत आदिवासी विकास महामंडळ तर गैर आदिवासी भागांत जिल्हा पणन कार्यालयाच्या उपअभिकर्ता संस्थांमार्फत शासकीय धान खरेदी केली जाते. नोंदणीकृत सर्व शेतकऱ्यांना बोनस देण्याचे शासनाने जाहीर केले आहे. पणन विभागाकडे १ लाख ५२ हजार ३१३ तर आदिवासी विभागाकडे ३७ हजार ८८७ अशा १ लाख ९० हजार २०० शेतकऱ्यांनी खरीप हंगामात नोंदणी केली आहे. जवळच्या गडचिरोली जिल्हयात बोगस शेतकऱ्यांची नोंदणी करून बोनस लाटल्याचा प्रकार समोर आल्यानंतर गोंदिया जिल्हयातही शेतकऱ्यांच्या याद्यांची पडताळणी सुरू असल्याची माहिती आहे. यामुळेच बोनस रक्कम हस्थांनतराला उशिर झाल्याचे सांगीतले जाते.

**शासनाने मागील वर्षी बोनसची रक्कम मार्च महिन्यात दिली होती. यामुळे पीक कर्ज फेण्यास शेतकऱ्यांना मदत झाली होती. यंदा मात्र हंगाम तोंडावर असूनही बोनसचा पत्ता नाही. शेतकरी अर्थिक विवंचनेत आहेत. शेती कसण्यासाठी शेतकरी कर्ज काढून, उधार–उशनवारी घेऊन खरीपाचे नियोजन करीत आहे. धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रशासनाने विना विलंब बोनस अदा करावा.**
**राजकुमार पटले, उपसभापती कृषी उत्पन्न बाजार समिती, गोंदिया**

# ३८ बालकांना दिले पालकांच्या ताब्यात




**गोंदिया :–** लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम २०१२ अंतर्गत एकूण २८ प्रकरणांत गृहचौकशी करून बाल कल्याण समितीच्या आदेशान्वये बालकांचे पुनर्वसन करण्यात आले आहे. ३८ बालकांना बाल कल्याण समिती अंतर्गत पालकांच्या ताब्यात देण्यात आल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

जिल्हा बाल संरक्षण समिती, बाल कल्याण समिती, बाल संरक्षण कक्ष, चाइल्ड हेल्पलाइन, सर्वसमावेशक सनियंत्रण समितीची आढावा सभा सोमवारी (दि. २६) जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी कामकाजाचा आढावा घेतला. यावेळी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी तुषार पौनीकर यांनी विविध विषयांवर कामकाजाचे सादरीकरण केले.

आढावा सभेला जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नितीन वानखेडे, पोलिस उपअधीक्षक नंदिनी चानपूरकर, जिल्हा माहिती कार्यालयाचे प्रतिनिधी संदीप पटले, बाल कल्याण समितीचे श्री जाधव, देवका खोब्रागडे, जयश्री कापगते, वर्षा हलमारे, अल्का वंदना दुबे, पूजा डोंगरे, परिविक्षा अधिकारी अनिल बांबोळे, संरक्षण अधिकारी मुकेश पटले, मनीषा चौधरी, धर्मेंद्र भेलावे, अशोक बेलेकर व इतर अधिकारी उपस्थित होते.

जिल्हा बाल संरक्षण समिती, सर्वसमावेशक सनियंत्रण समिती आणि चाइल्ड हेल्पलाइन त्रैमासिक बैठकीचे सादरीकरण जिल्हा बाल संरक्षण अधिकारी गजानन गोबाडे यांनी केले. बाल कल्याण समितीचे अध्यक्ष देवका खोब्रागडे यांनी बाल कल्याण समितींतर्गत करण्यात येत असलेल्या कामाचे सादरीकरण केले.

### ४० बालकांचे केले समुपदेशन

**दत्तक प्रक्रियेंतर्गत एकूण ४ प्रकरणांची गृहचौकशी करून आयुक्तालयाला अहवाल सादर करण्यात आला. त्याचबरोबर एकूण ४० बालकांचे समुपदेशन करण्यात आले व ३ बालकांना त्यांच्या स्थानिक राज्यात स्थानांतरण करून पालकांच्या स्वाधीन करण्यात आले. तसेच १२ बालकांचे आंतरराज्य, जिल्हा स्थानांतरण करण्यात आले आहे.**

### चाइल्ड हेल्पलाइनवर ६३ कॉल

**बालकांसंबंधित विविध कायद्यांची अंमलबजावणी करण्यासाठी तालुकास्तरावर २, ग्रामस्तरावर ३८ प्रशिक्षणे घेण्यात आले आहेत. त्याचबरोबर शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायत याठिकाणी जनजागृतीचे कार्यक्रम घेण्यात आलेले आहेत. चाइल्ड हेल्पलाइनच्या टोल फ्री क्रमांक १०९८ वर एकूण ६३ कॉल प्राप्त झाले असून, सर्व प्रकरणांचा पाठपुरावा करून त्याचे निराकरण करण्यात आल्याचे यावेळी सांगण्यात आले.**

### ५ बालविवाह रोखण्यात यश

**५ बालविवाह थांबविण्यात जिल्हा प्रशासनाला यश मिळाले आहे. चाइल्ड हेल्पलाइन गोंदिया कक्षाकडून बाल कल्याण समिती गोंदिया येथे २ बालके सादर करण्यात आली आहेत. तसेच १९ बालकांचे समुपदेशन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी आढावा बैठकीदरम्यान बालकांच्या संरक्षणाबाबत योग्य ती काळजी घेण्याची कार्यवाही, रेल्वे स्थानकावर किंवा रेल्वे प्रवासात फिरत असताना रेल्वे कर्मचाऱ्यांनी मदत करावी, तसेच चाइल्ड हेल्पलाइन १०९८ चा जिल्ह्यात जास्तीत जास्त प्रसार करण्यात यावा व व्हॉट्सअॅप ग्रुप तयार करण्यात यावे, अशा सूचना यावेळी देण्यात आल्या.**

# सर्जनशील शिक्षणाची मशाल पेटवणारा, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा खरा दीपस्तंभ! दिलीप वाघमारे

श्री.दिलीप वाघमारे हे बोळेगाव येथील सर्वसामान्य कुटुंबातून आलेले, पण असामान्य जिद्द आणि शिक्षणाच्या ताकदीवर यशस्वी वाटचाल करणारे आदर्श शिक्षक आहेत. आपल्या शिक्षणप्रेमामुळे त्यांनी अनेक अडचणींवर मात करत सांगली जिल्हा परिषद, प्राथमिक शाळा बाबरवस्ती पांडोझरी च्या शाळेत शिक्षक म्हणून यशस्वीपणे रुजू झाले. आणि आता नांदेड जिल्हा परिषद ,येथिल जिल्हा परिषदेनेच्या गोंडजेवली तांडा येथे कार्यरत आहेत. सांगली जिल्हा परिषेदेचाआदर्श शिक्षक पुरस्कार ही मिळालेला आहे.दिलीप वाघमारे हे विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी त्यांनी केवळ पुस्तकापुरते शिक्षण न देता, त्यांच्या सर्जनशीलतेला वाव देण्यासाठी विविध उपक्रम राबवले. ते नेहमीच नव्या



कल्पनांच्या शोधात असतात आणि शिक्षण क्षेत्रात नवनवीन प्रयोग करून विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाने भरभराटीच्या मार्गावर नेतात.

श्री.दिलीप वाघमारे यांनी घेतलेल्या व्यसनमुक्त होऊ या कुटुंब व्यसनमुक्त करूया ,वृक्षारोपण व संगोपन,असे अनेक उपक्रम व स्पर्धेसारखे उपक्रम हे त्यांच्या शिक्षणविषयक तळमळीचे उत्तम उदाहरण आहेत. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मनिर्भरता, कौशल्यविकास आणि स्थानिक संस्कृतीचे भान निर्माण होते. त्यांच्या कामात सातत्य, सर्जनशीलता आणि विद्यार्थ्यांबद्दलची आंतरिक आपुलकी दिसून येते. अशा शिक्षकांमुळे शाळा ही केवळ शिक्षणाचे ठिकाण न राहता, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे केंद्र बनते. श्री.दिलीप वाघमारे यांचे कार्य खरोखरच कौतुकास्पद असून, ते इतर शिक्षकांसाठी प्रेरणास्थान ठरतात.त्यांनी आज श्री.छत्रपती शिवाजी हायस्कूल,सगरोळी ता.बिलोली येथे सदिच्छा भेट दिली.त्यांना संस्थेचा विद्याव्रत अंक भेट देण्यात आला.

**–संभाजी गायकवाड**
**मुख्याध्यापक**
**श्री.छत्रपती शिवाजी हायस्कूल सगरोळी ता. बिलोली जि. नांदेड**

# भारत गौरव पर्यटन




छत्रपती शिवाजी महाराजांच्या तेजस्वी इतिहासाशी निगडीत महाराष्ट्रातील विविध ऐतिहासिक स्थळांना भेटी देवून शिवरायांचा जाज्वल्य इतिहास अनुभवण्याची सुवर्णसंधी "भारत गौरव टुरीस्ट ट्रेन' च्या माध्यमातून उपलब्ध झाली आहे. पर्यटन आणि इतिहासाची आवड असणाऱ्यांनी याचा लाभ घ्यावा. "भारत गौरव टुरिस्ट ट्रेन' या योजनेची ही माहिती.

भारतीय रेल्वे खानपान व पर्यटन महामंडळाने (आयआरसीटीसी), ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशाला उजाळा देण्यासाठी आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनकार्याचा अनुभव देण्यासाठी "छत्रपती शिवाजी महाराज सर्किट' या एका विशेष ट्रेनची घोषणा केली आहे. ही यात्रा भारत गौरव टुरीस्ट ट्रेन (भारत गौरव टुरिस्ट ट्रेन) अंतर्गत ९ जून २०२५ पासून सुरू होत आहे.

या ५ दिवसांच्या विशेष टूरमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनाशी संबंधित महत्त्वाच्या ऐतिहासिक स्थळांना भेट, इतिहासावर आधारीत कार्यक्रम असणार आहेत. या सहलीद्वारे महाराष्ट्रातील विविध ऐतिहासिक, धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व असलेल्या ठिकाणांचा पर्यटकांना अनुभव घेता येणार आहे.

भारत गौरव ट्रेनच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या तेजस्वी इतिहासाशी निगडीत धार्मिक आणि ऐतिहासिक स्थळांना व्यापक प्रसिद्धी मिळवून देण्याचा महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचा मानस आहे. याबाबत पर्यटनमंत्री शंभूराज देसाई व राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या नेतृत्वाखाली पर्यटन विभागाचे प्रधान सचिव डॉ. अतुल पाटणे, व्यवस्थापकीय संचालक मनोजकुमार सुर्यवंशी आणि पर्यटन संचालक बी. एन. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

ही केवळ एक यात्रा नसून, आपल्या वैभवशाली परंपरेचा, सांस्कृतिक वारशाचा आणि स्वाभिमानी इतिहासाचा साक्षात अनुभव घेण्याची सुवर्णसंधी आहे. भारतीय रेल्वे विभाग आणि महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांनी ऐतिहासिक उपक्रमासाठी विविध अंगांनी सुसज्ज तयारी केली आहे. भारत गौरव ट्रेन ज्या–ज्या ठिकाणी पोहोचेल, त्या ठिकाणी असलेल्या पर्यटन स्थळांची सविस्तर माहिती पर्यटकांना देण्यात येणार आहे.

यात्रेदरम्यान, सर्व प्रवाशांचा अनुभव सुखकर आणि संस्मरणीय व्हावा, यासाठी महामंडळाचे अधिकारी आयआरसीटीसीच्या समन्वयाने प्रत्येक टप्प्यावर मार्गदर्शन करतील. ५ दिवसांच्या या प्रवासात रेल्वेस्थानकांपासून ते गडकिल्ल्यांपर्यंत, प्रत्येक ठिकाणी इतिहासाच्या पाऊलखुणांचा वेध घेत, पर्यटकांना समृद्ध अनुभव दिला जाईल. प्रत्येक गडकोटावर, ऐतिहासिक स्थळी पर्यटन व्यवस्थेचे काटेकोर नियोजन केले जाईल. इतिहासावर आधारित कार्यक्रम, गाईड्स, तसेच स्थानिक शिवप्रेमी संघटनांच्या सहकार्याने ही यात्रा अधिक संस्मरणीय करण्यात येईल.

छत्रपती शिवाजी महाराज यांचा तेजोमयी इतिहास, महाराष्ट्राची शौर्यशाली परंपरा, आणि आपली समृद्ध संस्कृती जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचविण्याच्या शासनाच्या ध्यासाला महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ संपूर्ण समर्पणाने साथ देत आहे. या उपक्रमामुळे महाराष्ट्राच्या पर्यटनाला नवे क्षितिज गवसणार असून, प्रत्येक भारतीयाच्या हृदयात शिवप्रेमाची जाज्वल्य ज्वाला जागवली जाणार आहे. या प्रेरणादायी यात्रेत सहभागी होऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा वसा चालवावा, आपल्या संस्कृतीचा अभिमान बाळगावा, आणि नव्या पिढीला या इतिहासाचे दर्शन घडवावे, अशी अपेक्षा आहे.

सहल तपशील

**सहलीचे नाव:** छत्रपती शिवाजी महाराज सर्किट शुभारंभ दि. ९ जून २०२५ कालावधी: ५ दिवसांची यात्रा (सकाळी समाप्ती) प्रारंभ व समाप्ती स्थान: छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी), मुंबई प्रवास सुरु व संपण्याचे स्थानकं: दादर, ठाणे यात्रेचा प्रवासमार्ग– मुंबई (सीएसएमटी)–रायगड–पुणे–शिवनेरी–भीमाशंकर–प्रतापगड–कोल्हापूर–पन्हाळा–मुंबई.

**प्रमुख स्थळांची माहिती:** रायगड किल्ला – छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक येथे झाला व ही राजधानी होती. लाल महाल, पुणे – छत्रपती शिवाजी महाराज यांचे बालपण येथे गेले. कसबा गणपती व शिवसृष्टी, पुणे – पुण्याचे ग्रामदैवत व छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावरील संग्रहालय. शिवनेरी किल्ला – छत्रपती शिवाजी महाराज यांचे जन्मस्थळ. भीमाशंकर ज्योतिर्लिंग–१२ ज्योतिर्लिंग पैकी एक प्रमुख धार्मिक स्थळ. प्रतापगड किल्ला–अफझल खानावरील ऐतिहासिक विजयाचे ठिकाण. कोल्हापूर–महालक्ष्मी मंदिर पन्हाळा किल्ला – बाजीप्रभू देशपांडे यांच्या शौर्याचे प्रतीक. पॅकेज शुल्क (प्रति व्यक्ती) उपरोक्त सहलीसाठी विविध पॅकेजेस तयार करण्यात आली असुन सोयीनुसार इकोनॉमी (एसएल), कम्फर्ट (३ एसी), सुपीरियर (२ एसी) अशा प्रकारच्या सुविधांची निवड करता येणार आहे. या पॅकेजबाबत सविस्तर माहिती (आयआरसीटी) च्या संकेतस्थळावर देण्यात आली आहे.

**पॅकेज मध्ये समाविष्ट सेवा:** भारत गौरव ट्रेनने प्रवास (एसएल/३एसी/२एसी/एसी/नॉन–एसी) हॉटेलमध्ये राहण्याची व्यवस्था सर्व ठिकाणी स्थानिक वाहतूक व गाईड ऑनबोर्ड व ऑफबोर्ड शुद्ध शाकाहारी भोजन प्रवास विमा, सर्व प्रवेश शुल्क (किल्ले, मंदिरे, रोपवे, शिवसृष्टी इत्यादी), सुरक्षा व्यवस्था.

**पॅकेजमध्ये नसलेल्या सेवा:** – साहसी खेळ, बोटिंग इत्यादी. खोलीतील सेवांसाठी वेगळी रक्कम आकारली जाईल. इतर कोणताही वैयक्तिक खर्च. कोणतेही अतिरिक्त पर्यटन स्थळ.

**दैनंदिन टूर कार्यक्रम (संक्षिप्त):–** पहिला दिवस: मुंबई – रायगड – पुणे. दुसरा दिवस: पुणे (लाल महाल, शिवसृष्टी, कसबा गणपती). तिसरा दिवस: शिवनेरी – भीमाशंकर – पुणे. चौथा दिवस: प्रतापगड – कोल्हापूर. पाचवा दिवस: कोल्हापूर–महालक्ष्मी मंदिर–पन्हाळा किल्ला–मुंबई. सहावा दिवस: मुंबई (टूर समाप्त).

आरक्षण व अधिक माहितीसाठी संपर्क: – भारतीय रेल्वे खानपान व पर्यटन महामंडळाने (आयआरसीटीसी) वेबसाईट: www.irctctourism.com अधिकृत संकेतस्थळाला भेट देणे उपयुक्त ठरेल.

**विभागीय माहिती कार्यालय, अमरावती.**

**स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)**

# जिल्हा परिषद शाळेतील हजारो विद्यार्थी गणवेशापासून वंचित



## दुसरा गणवेश मिळालाच नाही

**माहिती मिळाली नसली तरी काही जिल्हा परिषद शाळांमध्ये मस्के यांनी पाठपुरावा केल्यानंतर बहुतांश विद्यार्थ्यांना दुसरा गणवेश मिळालाच नसल्याची धक्कादायक माहिती आहे. यावरून जिल्हा परिषद शालेय विद्यार्थ्यांप्रति किती सजग आहे, हे यावरून दिसून येते. अजून एक मोठा गणवेश घोटाळा उघडकीस येऊ नये, याकरिता ही माहिती लपविली जात असून, या प्रकरणाची नोंद घेऊन दोर्षीवर कारवाईची मागणी मस्के यांनी जिल्हा प्रशासनाला केली आहे.**

**गोंदिया :-** केंद्र सरकारच्या मसमग्र शिक्षाफ या अभियानांतर्गत पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना सरकारी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये दोन संच गणवेश मोफत मिळतात. सर्व विद्यार्थ्यांना गणवेश मोफत मिळतो, ज्यामुळे गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळतो. बहुसंख्य विद्यार्थ्यांना २०२४-२०२५ या शैक्षणिक सत्रात एक गणवेश मिळालाच नाही. याबाबत माहिती अधिकार कार्यकर्ते भूपेंद्र मस्के यांनी जिल्हा परिषदेत ऑनलाइन माहिती अधिकारात माहिती मागितली असता दीड महिना लोटूनही त्यांना माहिती देण्यात आलेली नाही.

मएक राज्य, एक गणवेशफ योजनाअंतर्गत मोफत गणवेश दिला जात असल्याने सामाजिक भेदभावाला आळा बसतो. गणवेशामुळे विद्यार्थी नियमितपणे राहतात शाळेला उपस्थित आणि शिक्षणावर लक्ष केंद्रित करतात. या योजनेमुळे विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळतो, कारण त्यांना स्वतःचा गणवेश खरेदी करण्याचा खर्च करावा लागत नाही; पण बहुसंख्य विद्यार्थ्यांना २०२४-२०२५ या शैक्षणिक सत्रात एक गणवेश मिळालाच नाही.

या प्रकरणाची शहानिशा करण्यासाठी माहिती अधिकार कार्यकर्ते भूपेंद्र मस्के यांनी जिल्हा परिषदेत ऑनलाइन माहिती अधिकारात सन २०२४-२५ या वित्तीय वर्षात समग्र शिक्षा कार्यक्रमांतर्गत राज्य शासनाच्या मोफत गणवेश, बूट व पायमोजे योजनेंतर्गत जिल्ह्यातील सर्व शाळानिहाय एकूण पटावर विद्यार्थी संख्या किती? व वाटप केलेल्या स्काऊट गाईड गणवेशाची संख्या तसेच नियमित गणवेशाची संख्या किती? यांची आकडेवारी उपलब्ध असलेल्या कागदपत्रांची छायांकित प्रत उपलब्ध करून द्यावी व सर्व शाळांची गणवेश वाटप नोंदवहीची छायांकित प्रती उपलब्ध करून द्यावी, अशी माहिती मागितली.

तसेच संबंधित निधीचे काय झाले, याकरिता सन २०२४-२५ या वित्तीय वर्षात राज्य शासनाच्या मोफत गणवेश बूट व पायमोजे योजनेंतर्गत शिक्षणाधिकारी (प्राथमिक) कार्यालयाने राज्य शासनाकडे निधीचे मागणी पत्र, जिल्ह्याला प्राप्त निधीचे दस्तऐवज व निधी खर्च केल्यानंतरचे उपयोगिता प्रमाणपत्र या दस्तऐवजाचे साक्षांकित प्रत उपलब्ध करून द्यावे, असे दोन माहिती अधिकार अर्ज लावले. परंतु दीड महिना होऊनही शिक्षणाधिकारी कार्यालयाने या अर्जाला केराची टोपली दाखवली. विहित वेळेत माहिती न मिळाल्याने अर्जदाराने व्यथित होऊन प्रथम अपील टाकली.

# जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या उमेदवारीसाठी अनेकांची धडपड

## संस्था गटात उमेदवारीसाठी होणार रस्सीखेच

**कार्यकारी तालुक्यातील सेवा ३६ सहकारी विविध संस्थेचा निवडणुकीत संस्था मतदारसंघ राहणार आहे. या संस्थेमधून एक बैंक संचालक निवडला जाणार. संस्था गटाचा विचार केल्यास तालुक्यात भाजप व राष्ट्रवादी गटाचे सर्वाधिक प्रभुत्व असल्याचे दिसून येत आहे. जवळपास २६ संस्थांवर एकहाती प्रभुत्व भाजप व राष्ट्रवादीचे असल्याचे सांगण्यात येत आहे. संस्था गटातून उमेदवारीध्य चांगलीच रस्सीखेच होणार, असे चित्र आजतरी तालुक्यात दिसत आहे. सर्वदृष्ट्या सक्षम असलेले पाच जण उमेदवारीसाठी तटस्थ असल्याचे भाजप गटातून दिसून येत आहेत. अनेकांना बँक संचालकाचे नवखा चेहरा पुढे आला तर नवल वाटायला नको. एकंदरीत बँकेच्या निवडणुकीची चाहूल लागताच काहींनी बैंक प्रतिनिधी मतदारांची भेट घेण्याचा प्रकार सुरू केल्याचे तालुक्यात दिसून येत आहे.**

**अर्जुनी-मोरगाव :-** गोंदिया जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निवडणूक बऱ्याच वर्षांनंतर होणार असून, अद्याप निवडणुकीचा अधिकृत कार्यक्रम जाहीर झाला नसला तरी तालुक्यातील सहकार क्षेत्रात हालचालींना वेग आला आहे.

मतदारांची यादी प्रसिद्ध होताच काही इच्छुकांनी आपली दावेदारी उघडपणे मांडण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे स्थानिक सहकारी संस्थांमध्ये चर्चा, गाठीभेटी आणि रणनीती बैठका सुरू झाल्या असून, अनेकांनी प्रत्यक्ष प्रचाराची तयारी देखील सुरू केली आहे. निवडणूक जाहीर होण्यापूर्वीच राजकीय मतगटांचे आकडेमोड सुरू झाले असल्याचे चित्र आहे.



जिल्हा सहकारी बँकेची निवडणूक जाहीर होताच तालुक्यातील राजकारण्यांनी आपले नाव बँक प्रतिनिधी म्हणून येण्यासाठी चांगली धडपड केली. सर्व आयुधांचा वापर करून काहींनी बँक प्रतिनिधी निवड प्रक्रियेत कमालीची बाजी मारली, अशी बोलकी चर्चा तालुक्यात आहे. तालुक्यातील सेवा सहकारी संस्था गटातून एक बैंक संचालक निवडला जातो. आजघडीला तालुक्यात सहकार क्षेत्रात कसलेले पट्टीचे मुरब्बी असे सहकार महर्षी आहेत. ज्यांनी आपली संपूर्ण कारकीर्द सहकार क्षेत्रामध्ये सर्वस्व पणाला लावले, असे महाभाग यावेळी होणाऱ्या सहकारी बँकेच्या निवडणुकीपासून दूर राहिले तर नवलच. अर्जुनी-मोरगाव तालुका सहकार क्षेत्रात नावारूपास आलेला आहे. तालुक्यातील तीन बँक संचालक एकाच वेळी यापूर्वी निवडून गेले होते. एकदा तालुक्याला बँकेचे उपाध्यक्षपदसुद्धा वाट्याला आले होते.

एका संचालकांनी तर हॅटब ट्रिकसुद्धा साधली होती, असे सांगण्यात येते. सहकार क्षेत्रामधूनच कित्येकांना सार्वजनिक राजकारणात जिल्ह्यातील यशोशिखरसुद्धा गाठता आले. जिल्हा बँकेच्या निवडणुका या पक्षीय राजकारणावर होत नसल्या तरी विद्यमान परिस्थिती लक्षात घेता यावेळी राष्ट्रवादी व भाजप एकोप्याने लढतील, असे सहकार गोटातून सांगितले जात आहे.

यावेळी काँग्रेस पूर्ण ताकदीनिशी बँकेची निवडणूक लढणार, असे आमदार नाना पटोले यांनी यापूर्वी जाहीर केले आहे. एकंदरीत बँक प्रतिनिधी मतदार यादी जाहीर होताच तालुक्यात निवडणुकीचे पडघम वाजायला सुरुवात झाली.

सहकार क्षेत्रातून राजकीय प्रवास सुरू करणारे जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांचा हा गृह तालुका असल्याने त्यांच्यासाठी बँकेची निवडणूक अतिप्रतिष्ठेची ठरणार आहे

# कोहलगावला झाशीनगर उपसा सिंचन योजनेचे पाणी मिळणार

**अर्जुनी मोरगाव:-** इटियाडोह प्रकल्पातील पाण्यापासून वंचित असलेल्या कोहलगावला अखेर झाशीनगर उपसा सिंचन योजनेचे पाणी मिळणार आहे. खासदार प्रफुल्ल पटेल यांच्या मध्यस्थीने हा विषय मार्गी लागला असून खासदार प्रफुल्ल पटेल यांच्या चर्चेनंतर प्रशासनाकडून हालचाल सुरू झाल्याचे दिसत आहे. यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.



तालुक्यातील महत्त्वाकांक्षी झाशीनगर उपसा सिंचन योजनेंतर्गत २५ दशलक्ष घनमीटर पाणी इटियाडोह प्रकल्पातून प्रकल्पग्रस्त १२ गावांना देण्याचे नियोजन करण्यात आले होते. मात्र, कोहलगाव येथील शेतकऱ्यांनी शेतातून कालवा खोदकामास विरोध केल्यामुळे कोहलगावला या योजनेचा लाभ मिळू शकलेला नाही. परिणामी, यंदा सुरू झालेल्या पाणीपुरवठ्यापासून कोहलगाव हे गाव वंचित राहिले. या पार्श्वभूमीवर कोहलगाव येथील सरपंच, सदस्य आणि शेतकऱ्यांनी खासदार प्रफुल्ल पटेल यांची भेट घेतली. त्यांनी कोहलगाव या गावाला झाशीनगर उपसा सिंचन योजनेचे पाणी पाइपलाइनद्वारे पुरविण्याची मागणी केली. या मागणीची गंभीर दखल घेत खासदार पटेल यांनी त्वरित संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधला. यानंतर कार्यकारी अभियंता अमृतराज पाटील यांनी यामध्ये लक्ष घालून संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना फोनद्वारे कोहलगाव येथील शेतीला झाशीनगर उपसा सिंचन योजनेचे पाणी देण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या. त्यांच्या निर्देशानुसार प्रशासनाने तत्काळ हालचाल सुरू केल्याचे स्थानिक स्तरावर दिसून येत आहे. या निर्णयामुळे कोहलगावच्या शेतकऱ्यांना दिलासा मिळणार असून, सिंचनाची समस्या दूर होण्याची अपेक्षा आहे. स्थानिक नागरिकांनी या निर्णयाचे स्वागत करीत खासदार प्रफुल्ल पटेल यांचे आभार मानले आहे.

## शहरातील ५४ जिर्ण इमारतींना मनपाची नोटीस

**चंद्रपूर-** महापालिका क्षेत्रातील शिकस्त इमारतींपासून परिसरातील रहिवाशांच्या जीविताला निर्माण होऊ शकणारा संभाव्य धोका पाहता चंद्रपूर महानगरपालिकेने कारवाई करण्यास सुरवात केली असुन मागील काही दिवसात ५४ जीर्ण इमारतींना नोटीस देण्यात आली आहे.

पावसाळ्यात दरवर्षी महापालिका क्षेत्रातील जीर्ण व शिकस्त इमारतींचा सर्व्हे करण्यात येतो. यात आढळलेल्या धोकादायक इमारतीतील रहिवाश्यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम २६४ अन्वये नोटीस जाहीर करण्यात येते. चंद्रपूर मनपातर्फे झोन १ अंतर्गत २८, झोन २ अंतर्गत १६ तर झोन ३ अंतर्गत १० अश्या एकुण ५४ धोकादायक इमारतींना नोटीस देण्यात आली आहे.

## तिरोडा तालुका कर्मचारी पतसंस्थेची निवडणूक निर्विरोध,अध्यक्षपदी रहागंडाले



**तिरोडा:-** तिरोडा तालुका कर्मचारी पतसंस्थेच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत सर्व संचालक मंडळाची निर्विरोध निवड करण्यात आली.सहाय्यक निबंधक डी.आर.नवघरे यांच्या अध्यक्षतेखाली बबीताताई गिरेपुंजे यांच्या उपस्थितीत तिरोडा तालुका कर्मचारी पतसंस्था पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. यामध्ये अध्यक्ष कन्हैयालाल साधुजी रहांगडाले,उपाध्यक्ष राजेश गोंडूजी पटले,कोषाध्यक्ष कु.निलू गुलाबराव लारोकर यांची निवड करण्यात आली.

नवनिर्वाचित संचालक सर्वस्वी राजू विठोबा गुनेवार,देवेंद्र लक्ष्मण गजभिये,संजय अनंतराम रहांगडाले, धर्मराज दुर्गाजी रिनायत, पालकर ईश्वर भारती, दिनदयाल फुलचंद पटले, शीलाताई धर्मराज पारधी,पुष्पाताई हरगोविंद पटले, तज्ज्ञ संचालक राजकुमार चामट, जवाहरलाल बोपचे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

नवनियुक्त पदधिकाऱ्याचे पं. स सभापती तेजराम चव्हाण, प्रगती पतसंस्थेचे उपाध्यक्ष दिपक पटले, नुतन बांगरे, वडेगावचे सरपंच श्यामराव बिसेन, राजेश गुणेरिया, जितेंद्र डहाटे, डी.टी.कावळे,श्री साकुरे, शितल कनपटे, संजय बोपचे सर्व कर्मचारी वृंद व मित्र मंडळींनी अभिनंदन केले

# पोलिस भरतीत आरक्षणासाठी आंदोलनाचा दिला इशारा

**गोंदिया:-** आगामी काळात जिल्हा पोलिस दलात ९७ जागांकरिता भरती होणार आहे. मात्र भरती प्रक्रियेत ओबीसी प्रवर्गासाठी जागा आरक्षित ठेवण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव अमर वराडे यांच्या नेतृत्वात बुधवारी (दि.२१) पोलिस अधीक्षक गोरख भामरे यांची भेट घेऊन ओबीसी प्रवर्गाकरिता आरक्षणाच्या तुलनेत १९ जागा आरक्षित ठेण्यात याव्यात अन्यथा आंदोलन पुकारण्याचा इशारा देण्यात आला.



गोंदिया जिल्हा पोलीस शिपाई पद भरती प्रस्तावित आहे. या पदभरती मध्ये ९७ जागा प्रस्तावित केलेले आहेत. त्यापैकी ओबीसी प्रवर्गाला १९ जागा मिळायला हव्या. परंतु गोंदिया जिल्हा पोलिस दलाच्या आस्थापनेवरील २०२०- २५ पोलिस शिपाई पदभरतीकरिता रिक्त असलेल्या पदांची ओबीसी प्रवर्गाकरीता एकही जागा दर्शविलेली नाही. मागील वर्षी सुद्धा पोलीस विभागाने ११० पदे भरली होती. यामध्ये ओबीसी विभागावर पूर्णता अन्याय करत त्यावेळी सुद्धा एकही जागा दर्शविलेली नव्हती. हा जिल्ह्यातील ओबीसी उमेदवारांवर अन्याय आहे. जिल्ह्यामध्ये जवळपास ७० टक्के असलेला ओबीसी समाज निरंतर दोन वर्षेपर्यंत पोलिस पदभरतीमध्ये जर अन्याय ग्रस्त राहत असेल तर ही बाब जिल्ह्यातील प्रशासन आणि लोकप्रतिनिधी करता अतिशय निंदा जनक आहे. त्यामुळे बुधवारी पोलिस अधीक्षक गोरख भामरे यांना ओबीसी संघटनांनी भेट घेऊन निवेदन देण्यात आले. आदिवासी बाहुल असलेल्या नक्षलग्रस्त जिल्हा म्हणून ओळख असलेल्या गोंदिया जिल्ह्यातपोलिस भरतीमध्ये ओबीसींना वंचित ठेवल्यास आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला.

यावेळी प्रामुख्याने प्रदेश काँग्रेस सचिव अमर वराडे यांच्यासह पोलिस भरतीतील युवक विक्की लिल्हारे, श्रीराम भगत, राज भगत, मंगेश लांजेवार, हितेश गौतम, तरुण पटले, सपन लक्षणे, आयुष तुरकर, अजय बिसेन, दिनेश मेंढे, रोहित नागरीकर, विकास बाट, राहुल बुल्ले, तुषार लांजेवार, जयेश खटोले, नितीन चुटे, समीर कापसे, राकेश पाटील संकेत लांजेवार, अंकित बनकर आदी प्रामुख्याने उपस्थित होते.


# कार्यालय ग्रामपंचायत परसटोला

## पंचायत समिती अर्जुनी/मोर, जिल्हा परिषद-गोंदिया

## निविदा सुचना

Email-parastolagp.rediffmail.com जा.क्र.११/२०२५/ दिनांक :- २८/०५/२०२५

ग्रामपंचायत परसटोला पं.स. अर्जुनी/मोर. जिल्हा परिषद गोंदिया येथे ग्रामपंचायत स्तर १५ वा वित्त आयोग निधी अंतर्गत खालील प्रमाणे बांधकाम करण्याकरिता नोंदणीकृत कंत्राटदाराकडून लिफाफा पद्धतीने ऑफलाईन निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | नियोजन वर्षे | सांकेतांक क्रं. | अंदाजपत्रक किंमत | निविदा फॉर्म किंमत | अनामत रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | ग्रामपंचायत विस्तारीकरण व दुरुस्ती करणे. | २०२०-२०२१ | ४०४१९०५० | ५००००० | ५०० | ५००० |
| २. | गावांतर्गत सिमेंट नाली उपसा करणे. | २०२४-२०२५ | ९६३८११२५ | २००००० | ५०० | २००० |
| ३. | बंदिस्त गटारे बांधकाम करणे | २०२४-२०२५ | ९६३८२५७६ | ५००००० | ५०० | ५००० |
| ४. | सार्वजनिक ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणे. | २०२४-२०२५ | ९६३९८१६१ | ३००००० | ५०० | ३००० |

१) वरील कामाची कोरी निविदा फॉर्म दि:- २८/०५/२०२५ ला १२.०० वाजेपासून ते दिनांक :- ०६/०६/२०२५४ ला सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) या कालावधी पर्यंत ग्रामपंचायत परसटोला येथे निविदा फॉर्म विक्री करण्यात येईल व निविदा फॉर्म खरेदी केल्यानंतर त्याची पावती मिळेल. २) सदर कामाची निविदा मोहरबंद लिफाफ्यात आवश्यक त्या कागदपत्रासह दिनांक :- २८/०५/२०२५ ते दिनांक :- ०६/०६/२०२५ ला सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (सुट्टीचे वगळून) ग्रामपंचायत कार्यालय परसटोला येथे अमानत रक्कम भरल्याची पावती मिळेल. ३) मोहरबंद निविदा शक्य झाल्यास माहे जुन २०२५ मध्ये होणाऱ्या मासिक सभेत उघडण्यात येईल.याची विशेष नोंद घ्यावी. ४) सदर कामाची तपशिलवार संपुर्ण माहिती अटी व शर्तीसह ग्रामपंचायत कार्यालय परसटोला येथील नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केली आहे.

**सरपंच**
**ग्रामपंचायत परसटोला**

**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत परसटोला**


# प्रचाररथांच्या माध्यमातून तलावांचे पुनरुज्जीवन कामांना गती

**गोंदिया :-** महाराष्ट्र शासनाच्या "गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार' तसेच "नाला खोलीकरण व रुंदीकरण' या महत्वाकांक्षी योजनेचे राज्यात जलद गतीने काम सुरु झालेले आहे. प्रत्येक गावागावात जाऊन या योजनेचा प्रचार रथाद्वारे प्रचार-प्रसार व जनजागृती केली जात आहे. या प्रचाररथांना राज्यातून मोठा प्रतिसाद मिळत आहे. तसेच ही मोहीम राबविण्यासाठी आवश्यक असलेले प्रशिक्षण जिल्हा व तालुका स्तरावर मोठ्या प्रमाणावर सुरु आहे.

जिल्हाधिकारी प्रजित नायर, जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी एम.मुरुगानंथम, जिल्हा मृद व जलसंधारण अधिकारी सत्यजीत राऊत यांच्या उपस्थिती व मार्गदर्शनाखाली सरपंच, ग्राम सेवक, शेतकरी यांना ऑडिओ, व्हिडिओ, पी.पी.टी. सादरीकरण या माध्यमातून प्रशिक्षण दिले जात आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते प्रचाररथाचे उद्घाटन करून गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार, नाला खोलीकरण तसेच नाला रुंदीकरण या योजनेची माहिती गोंदिया जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील गावामध्ये देण्यात आली. जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी नियोजन केले असून



जिल्ह्यातील सर्व जलसाठ्यातील गाळ काढण्यासाठी ग्रामपंचायती, सहकारी संस्था, सेवाभावी संस्था पात्र आहेत. आपले गाव जल आत्मनिर्भर करण्यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत अर्ज मागविण्यात येत असून आपले गाव पाणीदार करण्यासाठी शासनाच्या या योजनेचा लाभ घेऊन गावाच्या तलावातील, नाल्यातील गाळ काढून आपले गाव जल आत्मनिर्भर बनविण्याचे कार्य जिल्ह्यातील प्रत्येक गावातून केले जात आहे.

या योजनेची माहिती महाराष्ट्र शासनाच्या शिवार पोर्टलवर उपलब्ध असून मागणी अर्ज डाऊनलोड करून अर्जात संपूर्ण माहिती नमूद करून ते अर्ज संबंधित अधिकारी, सरपंच, ग्रामसेवक यांच्या स्वाक्षरीसह बी.जे.एस. ॲपवर अपलोड केले जात आहे.

"गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार' या योजनेची सर्व माहिती व अर्ज करण्यासाठी महाराष्ट्र शासनाचे www.shiwaar.com पोर्टलला भेट दयावी. डिमांड जनरेशन या टॅबवरुन मागणी अर्ज डाऊनलोड करुन भरलेला अर्ज बीजेएस ॲपवर अपलोड करावा. महाराष्ट्र राज्यातील जास्तीत जास्त गावांनी अर्ज करुन या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन मृद व जलसंधारण विभागाचे मंत्री संजय राठोड, राज्यमंत्री इंद्रनील नाईक तसेच सचिव गणेश पाटील यांनी केले आहे.

सदर योजनेद्वारे शासन गावागावातील तलावातील गाळ काढून त्यांचे पुनरुज्जीवन करणार आहे. गाळ गाढण्याचा संपूर्ण खर्च शासन करणार असून यासाठी संपूर्ण राज्यात एकच दर निश्चित करण्यात आलेला आहे. तसेच तलावातून काढलेला गाळ शेतात टाकण्यासाठी अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी, विधवा, अपंग, आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटूंबांना शासनाकडून निश्चित दरात अनुदान दिले जाणार आहे.

शासनाची ही योजना गावागावात पोहचवणे, शेतकऱ्यांना गाळ घेऊन जाण्यासाठी प्रोत्साहन देणे, जनजागृती करुन मागणी अर्ज निर्माण करणे, तसेच ङ्गगाळमुक्त धरणफ पोर्टलची निर्मिती करण्यासाठी भारतीय जैन संघटना आणि महाराष्ट्र शासन यांच्यात सामंजस्य करार झालेला आहे. बीजेएसने सर्व जिल्ह्यात नेमलेले प्रशिक्षीत जिल्हा समन्वयक हे शेतकऱ्यांना, ग्रामपंचायतीस, तालुका व जिल्हा प्रशासनाला सहयोग करीत आहेत.

या योजनेच्या जनजागृतीसाठी "सुहाना स्पाइसेस' यांनी बीजेएसला सहकार्य केले आहे. गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार, नाला खोलीकरण व नाला रुंदीकरण योजनेचा मागणी अर्ज कशाप्रकारे भरावा यासाठी जिल्हा समन्वयक रोशन गायधने (७०३८३९५२८४) यांचेशी संपर्क साधावा.


## (महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत उपक्रम)

## कार्यकारी अभियंता, मध्यम प्रकल्प विभाग, गोंदिया ता.गोंदिया जि.गोंदिया

**ई मेल:** mpdg.gondia@gmail.com **दुरध्वनी क्र.**07182-234832

## ई-निविदा सुचना क्र./18/2024-25 (दुसरी वेळ)

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालाच्या वतीने कार्यकारी अभियंता, मध्यम प्रकल्प विभाग, गोंदिया ता.गोंदिया जि.गोंदिया जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकाराकडून खालील कामाकरिता ब-1 नमुन्या तील ई-निविदा, प्रणाली (ऑनलाईन) निविदा मागवत आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या http:mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची रक्कम | बयाना रक्कम | कोऱ्या निविदेची रक्कम | पात्रता | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | तेढवा शिवनी प्रकल्पाच्या डाव्यामुख्य कालव्याच्या सा.क्र. 1560 मी.वर CR चे बांधकाम, ता.गोंदिया जि.गोंदिया | रू.18.30 लक्ष | रू.18500/- | रू.2000+ 18% जीएसटी= 2360/- | मजूर सहकारी संस्था गोंदिया जिल्ह्यासाठी राखीव | 06 महिने पावसाळा धरुन |

| | | |
|---|---|---|
| अ) ई-निविदा उपलब्ध कालावधी | :- | दिनांक 29/05/2025 वेळ 10.00 दिनांक 05/06/2025 वेळ 17.45 |
| ब) ई-निविदा सादर करण्याचा अंतिम कालावधी | :- | दिनांक 05/06/2025 वेळ 17.45 पर्यंत |
| क) ई-निविदा पूर्व बैठक | :- | निविदापूर्व बैठक होणार नाही |
| ड) ई-निविदा उघडणे | :- | दिनांक 06/06/2025 वेळ 17.45 पर्यंत |

(सदर निविदे सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास फक्त वरील वेबसाईट वरती कळविण्यात येईल.)

१. कार्यकारी अभियंता कार्यालयातून ई-निविदा कोरे प्रपत्रे विकली जाणार नाहीत.

२. सविस्तर निविदा सुचना महाराष्ट्र शासनाच्या इलेक्ट्रानिक टेन्डर management https://mahatenders.gov.in वर तसेच कार्यकारी अभियंता कार्यालयातील नोटीस बोर्डवर पहावयास मिळेल.

३. या कामाचे अंदाजपत्रक, दर, विश्लेषण, मोजमाप, नकाशे इ.कार्यकारी अभियंता, मध्यम प्रकल्प विभाग गोंदिया, ता.गोंदिया जिल्हा गोंदिया यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे.

जा.क्र.१४३१/निली/२०२५ दि.२०/०५/२०२५
जिमाका/गों/जाहि/१३/२०२५

**कार्यकारी अभियंता**
**मध्यम प्रकल्प विभाग**
**गोंदिया**

# २५ हजार २५३ शेतकऱ्यांना जिल्हा बँकेने दिले १७५ कोटी रुपयांचे पीककर्ज

**गोंदिया:–** खरीप हंगामासाठी जिल्ह्यातील २५ हजार २५३ शेतकऱ्यांनी आतापर्यंत १७५ कोटी ३५ लाख ३३ हजार रुपयांच्या पीककर्जाची उचल गोंदिया जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतून केली आहे.

खरीप हंगामात शेतकऱ्यांना खते, बियाणे, शेतीच्या मशागतीची कामे करण्यासाठी पैशाची गरज असते. यासाठी शेतकऱ्यांना सावकार व नातेवाइकांच्या दारात उभे राहण्याची वेळ येऊ नये यासाठी जिल्हा, राष्ट्रीयीकृत आणि ग्रामीण बँकेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना पीककर्ज उपलब्ध करून दिले. ३१ मार्चपूर्वी पीककर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना व्याजाचासुद्धा अधिक भुर्दंड बसत नाही, तर



पीककर्जाची उचल करण्याची प्रक्रिया ही जिल्हा बँकेची अधिक सुलभ आहे.

त्यामुळे जिल्ह्यातील शेतकरी जिल्हा बँकेतून मोठ्या प्रमाणात पीककर्जाची उचल करतात.

### यंदा उद्दिष्ट देण्याचा पडला विसर

**नाबार्ड आणि शासनाच्या माध्यमातून दरवर्षी जिल्हा बँक, राष्ट्रीयीकृत बँक, ग्रामीण बँक यांना पीककर्ज वाटपाचे उद्दिष्ट दिले जाते. पण यंदा मे महिना संपत आला तरी या बँकांना पीककर्ज वाटपाचे उद्दिष्ट देण्यात आले नाही. डीडीआर कार्यालयाला संदर्भात विचारणा केली यंदा खरीप हंगामात ४६० कोटी रुपयांच्या पीककर्ज वाटपाचे उद्दिष्ट आहे. पण बँकनिहाय किती उद्दिष्ट राहणार हे अद्याप स्पष्ट झाले नसल्याचे सांगितले.**

खरीप हंगाम सुरू होण्यास पंधरा ते वीस दिवसांचा कालावधी शिल्लक असला तरी शेतकऱ्यांनी खरीप हंगामपूर्व कामांना सुरुवात केली आहे. यासाठी शेतकऱ्यांना पैशाची गरज असते. शासन आणि नाबार्डने अद्यापही बँकांना पीककर्ज वाटपाचे उद्दिष्ट दिलेले नाही. पण जिल्हा बँकेचे अध्यक्ष राजेंद्र जैन व संचालक मंडळाने शेतकऱ्यांची अडचण होऊ नये म्हणून शेतकऱ्यांना पीककर्ज वाटप करण्याचा निर्णय घेतला. यानुसार सध्या जिल्हा बँकेने १७५ कोटी ३५ लाख ३३ हजार रुपयांच्या पीककर्जाचे वाटप जिल्ह्यातील २५ हजार २५३ शेतकऱ्यांना केले आहे. दरवर्षी जिल्हा बँक खरीप हंगामात तीनशे ते साडेतीनशे कोटी रुपयांच्या पीककर्जाचे वाटप करते. याची शेतकऱ्यांना मोठी मदत होत असते.

# गोंदियात होणार ५० खाटांचे अत्याधुनिक क्रिटिकल केअर हॉस्पिटल

## २३ कोटी रुपयांचा निधी मंजूर : विनोद अग्रवाल यांची माहिती

**गोंदिया :–** केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी प्रधानमंत्री आत्मनिर्भर स्वस्थ भारत योजनेंतर्गत शहरातील कुडवा परिसरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या आवारात ५० खाटांचे अत्याधुनिक क्रिटिकल केअर हॉस्पिटल मंजूर करण्यात आले आहे. या हॉस्पिटलच्या बांधकामाला शुक्रवारपासून (दि.२३) सुरुवात करण्यात आली. या हॉस्पिटलची जिल्ह्यातील सर्वसामान्य रुग्णांना मदत होणार असल्याचे आ. विनोद अग्रवाल यांनी सांगितले.

या ५० खाटांच्या क्रिटिकल केअर हॉस्पिटलमुळे रुग्णांना जिल्ह्यातच दर्जेदार आरोग्यविषयक सुविधा मिळणार आहेत. या रुग्णालयासाठी २३ कोटी ७५ लाख रुपयांची प्रशासकीय निधी मंजूर करण्यात आला आहे. क्रिटिकल केअर हॉस्पिटल केवळ गोंदिया जिल्ह्यासाठीच नव्हे, तर परिसरातील ग्रामीण भागातील



रुग्णांसाठीसुद्धा एक वरदान ठरणार आहे. कुडवा येथील शासकीय रुग्णालयाच्या आवारातच हे रुग्णालय असणार आहे. जनतेला आरोग्याच्या चांगल्या सोयी सुविधा मिळाव्यात यासाठी माझे सदैव प्रयत्न राहणार आहे. हे हॉस्पिटल केवळ उपचाराचे केंद्र न राहता, विश्वास व दिलासा याचे प्रतीक ठरेल, असा विश्वास आ. विनोद अग्रवाल यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाला वैद्यकीय महाविद्यालयाचे डॉक्टर, अधिकारी, पंचायत समिती सभापती मुनेश रहांगडाले, सरपंच बालकृष्ण बिसेन, जि. प. पशुसंवर्धन सभापती दीपा चंद्रिकापुरे, पं. स. सदस्य राहुल मेश्राम, उपसरपंच कमल फरदे व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते

# शहरवासीयांच्या समस्या प्राधान्याने मार्गी लावा-प्रशांत पडोळे



### खासदारांनी शहरात फिरून घेतला आढावा

**खा. प्रशांत पडोळे यांनी गुरुवारी (दि.२२) एका कार्यकर्त्याच्या दुचाकीवर बसून शहरातील विविध भागांना भेटी देऊन तेथील समस्यांचा आढावा घेतला. यावेळी प्रभागातील नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या, तसेच नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांना या समस्या मार्गी लावण्याचे निर्देश दिले.**

**गोंदिया :–** शहराची स्वच्छता व्यवस्था, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, रस्त्यांची दुरुस्ती, नाल्यांची सफाई, ड्रेनेज व्यवस्था, अंडरग्राउंड सुविधा, विद्युत विभागाशी संबंधित अडचणी आणि नागरिकांच्या मूलभूत सुविधांशी संबंधित समस्या नगर परिषदेंतर्गत येणाऱ्या सर्व विभागांनी प्राधान्याने मार्गी लावाव्यात, अशा सूचना खा. डॉ. प्रशांत पडोळे यांनी दिल्या.

आ. अभिजित वंजारी, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष दिलीप बन्सोड, प्रदेश सचिव अमर वराडे, शहराध्यक्ष अॅड. योगेश अग्रवाल, विशाल अग्रवाल, राजकुमार बाबा बागडे, अमन तिगाला, राजकुमार पप्पू पटले,नागरत्न बन्सोड, माजी नगरसेवक सुनील भालेराव, व्यंकट पाथरू, रूपाली ऊके, अमर राहुल, आलोक मोहंती, जहीर अहमद, राहुल बावनथडे, अंकुश गजभिये, प्रतीक लांजेवार, अरमान जायसवाल, राजेंद्र दुबे, शैलेश जायसवाल, अमान रोघाटिया, देवचंद बिसेन, कशिश चंद्रिकापुरे उपस्थित होते.

नगर परिषद कार्यालयात गुरुवारी (दि. २२) महत्त्वपूर्ण आढावा बैठक–घेतली. या बैठकीत नगर परिषदेंतर्गत– असलेल्या सुरु विविध विकासकामांची सविस्तर पाहणी करून चर्चा करण्यात आली. खा. पडोळे यांनी केंद्र व राज्य शासनाच्या जनकल्याणकारी योजना सामान्य नागरिकांपर्यंत वेळेत पोहोचल्या पाहिजेत, याची खात्री करावी. विशेषतः पावसाळ्यापूर्वी नाल्यांची सफाई आणि जलनिःस्सारण व्यवस्था सुधारण्यावर भर दिला. गोंदिया शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. नागरिकांच्या समस्या वेळेत व मार्गी लावणे हेच आमचे मुख्य उद्दिष्ट असल्याचे सांगितले. यावेळी नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांनी आवश्यक सूचना केल्या.

# गुमाधावडातील अनेकांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश



**तिरोडा:–** तालुक्यातील गुमाधावडा येथील अनेक नागरिकांनी खा.प्रफुल पटेल यांचे जनसंपर्क कार्यालय, गोंदिया येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.यामध्ये शिवसेना महिला तालुका अध्यक्षा स्नेहा देशभ्रतार यांच्या सोबत संध्या भालाधरे, रंजीता भालाधरे, दुर्गा नागदेवे, प्रतिमा राउत, शुभेच्छा नागदेवे, सरस्वता नागदेवे, रोहित ठाकरे यांनी पक्षाचा दुपट्टा वापरून माजी आमदार राजेंद्र जैन यांच्या प्रमुख उपस्थितीत तिरोडा तालुका अध्यक्ष जगदीश बावनथडे यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

खासदार प्रफुल पटेल यांच्या विकासात्मक धोरणांवर व सक्षम नेतृत्वावर विश्वास ठेवून पक्षात प्रवेश केला. पक्ष प्रवेशामुळे या तालुक्यात निश्चितच संघटन शक्ती वाढेल व पक्ष मजबूत होणार असून सर्व प्रवेशितांना पुढील वाटचालीच्या त्यांनी शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी सर्वश्री राजेंद्र जैन, जगदीश बावनथडे, योगेंद्र भगत, राजू ठाकरे, अल्केश मिश्रा, हर्षवर्धन मेश्राम सहित पक्ष पदाधिकारी व कार्यकर्ता उपस्थित होते.

# लोकशाही दिन २ जून रोजी

**गोंदिया :–** जिल्ह्यात सर्वसामान्य जनतेसाठी दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. जून महिन्यात पहिल्या सोमवारी दि.२ जून २०२५ रोजी सकाळी ११ वाजता लोकशाही दिनाचा कार्यक्रम जिल्हाधिकारी प्रजित नायर यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. लोकशाही दिनानिमित्ताने जिल्हाधिकारी यांचेकडून जनतेच्या तक्रारी, अडचणी व गाऱ्हाणी ऐकून घेण्यात येतील आणि शासनाच्या विविध विभागाचे जिल्हा स्तरावरील प्रमुख अधिकारी यांना त्यासंबंधी कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात येतील.

# विविध अनुदानीत योजनांकरीता ३० जूनपर्यंत प्रस्ताव आमंत्रित

**गोंदिया:–** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय गोंदिया मार्फत व्यायामशाळा विकास अनुदान, क्रीडांगण विकास अनुदान व युवक कल्याण योजना अंतर्गत ग्रामीण भागातील युवक मंडळांना आर्थिक सहाय्य व समाजसेवा शिबीर भरविणे इत्यादी योजनेकरीता अनुदान वितरीत केले जाते.सन २०२५–२६ या आर्थिक वर्षाकरीता जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण, अनुसूचित जाती उपयोजना, टिएसपी, ओटिएसपी अंतर्गत क्रीडांगण विकास अनुदान योजना, व्यायामशाळा विकास अनुदान योजना व युवक कल्याण योजनांचे प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

क्रीडांगण व व्यायामशाळा विकास अनुदान योजनांतर्गत ज्या संस्थांना अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे अशा संस्थांनी विनियोग प्रमाणपत्र, काम पुर्णत्वाचा दाखला, अनुदानाचा लेखा परिक्षण विवरणपत्र, बांधकाम प्रकल्पाचे फोटाग्राफ व इतर अनुषंगिक कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे.

सदर योजनांच्या अटी व शर्तीची पुर्तता करणाऱ्या गोंदिया जिल्ह्यातील संबंधित संस्थांनी आपले परिपुर्ण प्रस्ताव जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल, मरारटोली, गोंदिया येथे दि.३० जून २०२५ पर्यंत सादर करावे. सदर योजनांकरीता उशिरा आलेले व अपुर्ण प्रस्ताव स्विकारले जाणार नाही. तसेच उपलब्ध निधीच्या अधिन राहून नव्यानेच परिपुर्ण प्रस्ताव स्विकारले जातील.

# वेगळ्या विदर्भाच्या आंदोलनात नागरिकांचा सहभाग वाढविणार

**गोंदिया :–** केंद्र सरकारने राज्य घटनेतील अनुच्छेद तीन नुसार विदर्भ राज्य त्वरीत निर्माण करावे अशी मागणी मागील १२० वर्षापासूनची केली जात आहे. दरम्यान कायमची असलेल्या मागणीचा निकाल लाण्यात यावा, या उद्देश्याने गोंदिया, भंडारा जिल्ह्यातील ग्रामीण भागातील नागरिकांनी या आंदोलनात सहभाग वाढविण्यासाठी विदर्भ राज्य आंदोलन समितीचे ७ जून रोजी भंडारा येथील वंजारी सभागृहात मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. त्या अनुषंगाने जिल्ह्यात विदर्भराज्य आंदोलन समितीची सभा पार पडली.

पूर्व विदर्भातील भंडारा, गोंदिया जिल्हयासह सर्व ६४ तालुक्यात,




देशात सर्वाधिक कर्जात बुडाले आहे. विदर्भात २३ प्रकारच खनिजे आहेत. महाराष्ट्रातील ७० टक्के वीज विदर्भात निर्माण होते. बारमाही वाहणाऱ्या नद्या असून ५४ टक्के जंगल असूनही विदर्भावर अन्यायच केला जात आहे. केंद्र सरकारने राज्य घटनेतील अनुच्छेद तीन नुसार विदर्भाचे वेगळे राज्य त्वरीत निर्माण करावे आणि

विदर्भ राज्याच १२० वर्षापासूनची असलेली मागणी कायमसाठी निकालात काढावी. हा संदेश भंडारा व गोंदिया जिल्हयातील गावागावात पोहोचवून, जनजागरण करून, विदर्भ आंदोलनात समाजातील सर्व घटकांचा सक्रीय सहभाग वाढवून, त्यासाठी पूर्व विदर्भातील जनतेची मानसिकता तयार करण्यासाठी विदर्भ राज्य

### ७ जून रोजी विदर्भ राज्य आंदोलन समितीचा मेळावा

आंदोलन समितीचा पूर्व विदर्भाचा मवेगळे विदर्भ मेळावाफ ७ जून आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यात पूर्व विदर्भातील जनतेने मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन विदर्भराज्य आंदोलन समितीने केले आहे.

बैठकीला एड. वामनराव चटप (अध्यक्ष, वि.रा.आं.स.), प्रभाकर कोडबत्तुनवार (को.क सदस्य), अतुल सतदेवे (जिला समन्वयक गोंदिया), संजय केवट ( गोंदिया भंडारा विभाग प्रमुख), दादाराव फुंडे (जिलाध्यक्ष, गोंदिया), विजय नवखरे (जिलाध्यक्ष, भंडारा), संतोष पांडे (वरिष्ठ विदर्भवादी), छैलबिहारी अग्रवाल (को.क. सदस्य) वसंतराव गवळी (गोंदिया शहर समन्वयक), अरुण बन्नाटे (गोंदिया जिलाध्यक्ष युवा आघाडी), पंचशिला पानतवने (जिलाध्यक्ष म.आ.), दिपा काशिवार (को.क. सदस्य), सुंदरलाल लिल्हारे (को.क. सदस्य), अजय गौर (को. क. सदस्य), व्ही.बी. चौधरी (को.क. सदस्य), भोजराज ठाकरे (उपाध्यक्ष गोंदिया जिला), सी.पी.बिसेन ( जिला महासचिव), यशवंत रामटेके, एस पी बोरकर, बाबुराव जनबंधु, अशोक बनसोड, लालाजी कुचेकर, नागेश गौतम, वजीर बिसेन, प्रदीप उजवने, कमलेश उके आदि विदर्भवादी कार्यकर्ता पदाधिकारी उपस्थित होते.

# त्या बिबट्याच्या मृत्यू वाघाच्या झुंजीत

**गोंदिया:–** अर्जुनी मोरगाव वनपरिक्षेत्रातंर्गत सोनेगाव झुडपी जंगलातील कक्ष क्र. १३८८ मध्ये २३ मे रोजी सकाळी गस्तीवरील वन विभगाच्या पथकाला मृत बिबट कुजलेल्या अवस्थेत आढळला.तो सहा ते सात वर्ष वयाचा असून नर होता. बिबट्याच्या शरीरावरील जखमांवरून त्याचा मृत्यू वाघाच्या हल्लयात झाल्याचा प्राथमिक अंदाज वर्तविण्यात आला आहे.

बोंडगावदेवी वनक्षेत्राचे सहायक वनसंरक्षक आपल्या पथकासह जंगलात गस्तीवर असताना ही बाब उघडकीस आली. त्यांनी याची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिल्यावर ते घटनास्थळी दाखल झाले. यानंतर पंचनामा करून बिबट्याच्या मृतदेह जाळून नष्ट करण्यात आला.विशेष म्हणजे, मृत



बिबट्याच्या दोन्ही पायावर, मानेवर व खांद्यावर नखाचे ओरखडे तसेच मानेचे हाड टुटलेले आढळल्याने त्याचा मृत्यू अन्य वन्यप्राण्यांच्या हल्लयात झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. याप्रकरणी वनगुन्हा जारी करण्यात आली असून पुढील तपास नवेगावबांधचे प्रकाष्ठ निष्कासन अधिकारी करीत आहेत.

# महाराष्ट्र टाईम्स चे संपादक श्रीपाद अपराजित यांना मातृशोक

**नागपूर :–** महाराष्ट्र टाईम्स चे संपादक श्रीपाद अपराजित यांच्या मातोश्री श्रीमती कल्पनाताई विनायकराव अपराजित यांचे आज सोमवार, दि.२६ मे रोजी दुपारी वृध्दापकाळाने निधन झाले. त्या ८३ वर्षांच्या होत्या. त्यांच्या मागे मुलगा, सून, नातवंड आणि बराच मोठा आप्तपरिवार आहे.



त्यांच्यावर सोमवारी संध्याकाळी ७ वाजता सहकारनगर घाटावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी नातेवाईकासंह मित्रमंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्ह्यातील दुसरा गरूड कमांडो निखिलचे स्वागत



**हे यश हे केवळ माझे नाही, तर माझ्या कुटुंबाचे आणि गावकऱ्यांचेही आहे. त्यांनी वेळोवेळी दिलेला आधार आणि प्रेरणेनेच मी आज या ठिकाणी पोहोचू शकलो.**

**– निखिल ठाकरे**

**गोंदिया:–** गोरेगाव तालुक्यातील ग्राम गिधाडी या छोट्याशा गावातील निखिल विद्या रूपचंद ठाकरे याने अपार कष्ट आणि जिद्दीच्या बळावर भारतीय वायुदलाच्या गरूड कमांडो पदावर निवड होण्याचा मान पटकावला आहे. जिल्ह्यातील तो दुसरा गरूड कमांडो ठरला असून, त्यांच्या या यशामुळे संपूर्ण गावात आनंदाचे वातावरण आहे. यातूनच मंगळवारी (दि. २०) गावकऱ्यांनी निखिलचे गावात ढोल–ताशांच्या गजरात जंगी स्वागत केले.

निखिल ठाकरे यांचे वडील सन २०१० मध्ये मरण पावल्याने संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी त्याच्यावर आली. घरी कमावणारा कोणीच नव्हता. आई आणि लहान भावाची जबाबदारी सांभाळत त्याने कष्टाचा मार्ग स्वीकारला. सुरुवातीला पेपर वाटण्याचे काम, नंतर जेसीबी चालक म्हणून काम करत त्याने आपल्या स्वप्नांकडे वाटचाल सुरू ठेवली. भारतीय हवाई दलाच्या गरूड कमांडोसाठी घेतल्या जाणाऱ्या कठीण चाचण्या आणि शारीरिक प्रशिक्षण पूर्ण करत त्याने यश मिळिवले. याआधी तिरोडा तालुक्यातून एकजण गरूड कमांडो बनला असून, जिल्ह्यातून निखिल दुसरा ठरला आहे.यामुळे गावात आनंदाचे वातावरण असून, गावकऱ्यांनी त्याचे जल्लोषात स्वागत केले. यावेळी जिल्हा परिषद बांधकाम सभापती डॉ. लक्ष्मण भगत, पं. स. सभापती चित्रलेखा चौधरीसह ग्रामपंचायत सदस्य व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पदवीधर बेरोजगारांसाठी गोंदियात २९ मे रोजी रोजगार मेळावा

## गोविंदराव वंजारी फाऊंडेशनचे आयोजन : महाराष्ट्रातील नामांकित कंपन्यांचा सहभाग

**गोंदिया:–** गोविंदराव वंजारी फाऊंडेशनच्या वतीने पदवीधर बेरोजगारांसाठी गुरुवार दिनांक २९ मे रोजी सकाळी १० ते ६ या वेळेत येथील लकी लॉन्स, गोरेगाव रोड, फुलचूर, गोंदिया येथे भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती आमदार अभिजित वंजारी यांनी पत्रपरिषदेत दिली.

ते म्हणाले, या मेळाव्यात मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. महाराष्ट्रातील सुमारे ४० नामांकित कंपन्या या रोजगार मेळाव्यात सहभागी होणार असून



थेट मुलाखतीच्या माध्यमातून उमेदवारांची निवड करणार आहेत. निवड झालेल्या उमेदवारांना त्याच ठिकाणी नियुक्तीपत्र देण्यात येणार आहे.

सदर रोजगार मेळाव्यात जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील पदवीधर बेरोजगार सहभागी होऊ शकतील. तत्पूर्वी त्यांना ऑनलाईन नोंदणी करावी लागेल. रलहळक्षळ्ीुंरपक्षरीळ.लो या वेबसाईटवर जाऊन ही नोंदणी करता येईल. नोंदणी झालेल्या उमेदवारांनी २९ मे रोजी नियोजित ठिकाणी शैक्षणिक पात्रतेचे सर्व कागदपत्रे घेऊन उपस्थित राहणे बंधनकारक आहे. संबंधित उमेदवारांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार संबंधित कंपनीना देण्यात आलेल्या क्रमांकाचे टोकण उमेदवारांना देण्यात येईल. त्यानुसार, संबंधित क्रमांकाच्या दालनात त्यांची मुलाखत होईल. निवड झालेल्या उमेदवारांना मेळाव्यातच नियुक्तीपत्र देण्यात येईल. या मेळाव्यात जास्तीत जास्त पदवीधर बेरोजगारांनी सहभागी होऊन संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजन समितीचे मार्गदर्शक आमदार अॅड. अभिजित वंजारी यांनी केले आहे. पत्रपरिषदेला माजी आमदार दिलीप बनसोड, अमर वऱ्हाडे, श्रीमती वंदना काळे, डॉ. हेमंत सोनारे उपस्थित होते.

# हड्डीटोली परिसरातील तलाव ठरतोय घातक

**गोंदिया :–** शहरातील हड्डीटोली आझाद वॉर्ड क्रमांक १ परिसरात रेल्वे प्रशासनाने तलाव तयार केला होता. मात्र, हा तलाव आता उपयोगी नसून तो बुजविण्याची मागणी परिसरातील नागरिकांनी अनेकदा रेल्वे प्रशासनाकडे केली. मात्र, त्यांनी अद्यापही याची दखल घेतली नसून या तलावात आतापर्यंत पाच जणांचा बळी गेला आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने याची दखल घेऊन हा तलाव त्वरित बुजविण्याची मागणी या परिसरातील नागरिकांनी केली आहे.

शहरातील हड्डीटोली परिसरात वस्ती लगत असलेल्या



रेल्वे प्रशासनाने रेल्वेगाड्या धुण्यासाठी २०० फूट रुंद ८० फूट खोल असलेला तलाव तयार केला. या तलावाची रुंदी दरवर्षी वाढत आहे. तर पावसाळ्यात या तलावाचे पाणी परिसरातील नागरिकांच्या घरात साचते. यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात नुकसान सहन करावे लागत आहे. या तलावात बुडून पाच जणाचा मृत्यू झाला आहे. विशेष म्हणजे

या तलावासाठी रेल्वे विभागाने अद्यापही सुरक्षा भिंतीचे बांधकाम केले नाही. त्यामुळे तलावाचे पाणी वस्तीमध्ये शिरते. याच तलावात बुडून १३ मे रोजी सन्नी चंदन गेडाम या युवकाचा मृत्यू झाला. या तलावामुळे वारंवार घटना घडत असतानासुद्धा रेल्वे विभागाकडून कुठलीच उपाययोजना केली जात नसल्याने नागरिकांमध्ये रोष व्याप्त आहे.

### तलाव बुजवा अन्यथा तीव्र आंदोलन

**हड्डीटोली परिसरातील तलाव रेल्वे विभागाने त्वरित बुजवावा अन्यथा या विरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. यामुळे कुठली गंभीर परिस्थिती निर्माण झाल्यास त्याला केवळ रेल्वे प्रशासन जबाबदार राहील असा इशारासुद्धा येथील नागरिकांनी दिला आहे.**

### लोकप्रतिनिधींनो दखल घ्या

**हड्डीटोली परिसरातील तलाव बुजविण्याची मागणी वारंवार रेल्वे विभागाकडे करण्यात आली. पण त्यांनी याची अद्यापही दखल घेतली नाही. त्यामुळे या परिसरातील नागरिकांना धोका कायम आहे. लोकप्रतिनिधी आणि जिल्हा प्रशासनाने याची दखल घेऊन तलाव बुजवावा अशी मागणी शारदा गेडाम, चांदनी गेडाम, नरेंद्र मेश्राम, दिव्या कांबळे, कुश्मा मेश्राम, कलाबाई भालाधरे, सरोज बन्सोड, स्वाती थापा, मधुरेखा, उषा भालाधरे, प्रीती बन्सोड, सुनीता भालाधरे, आशा भिवगडे, रेखा बन्सोड यांनी केली आहे.**

# ग्रा.पं. दारू पिणाऱ्यावर १ हजार, विक्रेत्यावर १० हजाराचा दंड ठोठावणार

**गोंदिया :–** व्यसनाला आळा घालण्यासाठी तसेच दारू समाजातील तंटे, भांडणाचे कारण आहे, दारूमुळे अनेकांचे संसार उघडयावर आले आहेत. यावर उपाय म्हणून देवरी तालुक्यातील मगरडोह ग्रामपंचायतीने दारू पिणाऱ्यावर १ हजार तर विक्रेत्यावर १० हजाराचा दंड ठोठावणार असल्याचा ठराव संमत केला आहे. गावात दारूबंदीबाबत मगरडोह येथील सांस्कृतिक सभागृहात सोमवार १९ मे रोजी ग्रामपंचायत अधिकारी, पदाधिकारी आणि महिला ग्रामसंघाची संयुक्त बैठक झाली.

बैठकीत सर्व संमतीने गावात दारूबंदीचा निर्णय घेण्यात आला. यावेळी ग्रामपंचायतीचे पदाधिकारी आणि ग्रामसंघाच्या महिलांसह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. बैठकीत गावात दारूबंदीचा ठराव मंजूर करून शपथ घेण्यात आली.

ठरावानुसार गावात जर कोणी दारू पिऊन आला आणि गोंधळ घातला तर १ हजार रुपये दंड आकारला जाईल. कोणी दारू विकताना आढळला तर त्याच्याकडून १० हजार रुपये दंड वसूल केला जाईल. एवढेच नाही तर कोणी गावात दुसऱ्यांदा दारू विकताना आढळला तर त्याच्या कडून ५० हजार रुपये दंड वसूलला जाणार आहे.

कोणी दारू पिऊन गावात गोंधळ घालताना आढळल्यास संबंधित व्यक्तीला ग्रामपंचायत स्तरावरील सरकारी योजनांचा लाभ दिला जाणार नाही, शासकीय कामांसाठी, योजनांसाठी आवश्यक असलेले कागदपत्र, प्राणपत्र, दाखलेही दिले जाणार नसल्याचे बैठकीत सर्वसंमतीने ठरविण्यात आले. बैठकीला सरपंच मालन कोरेटी, ग्रामसंघ पदाधिकारी कल्पना मेळे, सरिता उईके, जिजा भोयर, नंदकला गावड, शेवंता मेळे, पुष्पा उईके, नीता भोगारे, जसवंता हरहुडे, सरपंच सुनीता दाणे, भैसारे, राकेश भैसारे, गुणेष्वर बिसनकर, सीमा अचले, गीता डोंगरे, बिरसा ब्रिगेडचे मोतीराम तोफे, पुनेश भोयर, मनोहर भोगारे, सेवकराम कुरसुंगे, लोकेश उईके यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.